SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १०.०६.२०२६ | अंक नं. ०६० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
हा सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो / बर्डपार्क / झीप लाईन / ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर





स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



अधिक मास आता बनवा अधिक खास
10 जून 2026 रोजी
CKJ मधील सोन्याचा भाव
22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹13547/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹999/-*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


# जिल्हा शासकीय रुग्णालयातून 'वैद्यकिय कायदेशिर' कागदपत्रांची चोरी

## एखाद्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा कायदेशीर पुरावाच नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय

नगर - जिल्हा शासकीय रुग्णालयातील रेकॉर्ड रुम फोडून सन २०२१ ते २०२२ दरम्यानचे 'एमएलसी, ओपीडी, एक्स-रे विभागाचे बांधून ठेवलेले महत्त्वाचे कागदपत्रांचे २४ गठ्ठे चोरट्याने चोरुन नेल्याची घटना समोर आली आहे. ही चोरी म्हणजे त्या काळात घडलेल्या एखाद्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा कायदेशीर पुरावाच नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी रुग्णालयाचे कनिष्ठ लिपिक कैलास काशिनाथ शिंदे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चोराच्या विरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. फिर्यादी कैलास शिंदे हे जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या एमएलसी विभागात कनिष्ठ लिपिक म्हणून काम करतात. रुग्णालयातील व्हिडिओ कॉन्फरन्स आणि सिटी स्कॅन रूमच्या जवळ असलेल्या खोली क्रमांक २८ मध्ये मागील १५ वर्षांचे न्यायालयीन व पोलीस केस संबंधित जुने रेकॉर्ड ठेवण्यात आलेले आहे. ५ जून रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे रेकॉर्ड रूम व्यवस्थित कुलूप लावून बंद करण्यात आली होती. त्यानंतर ९ जून रोजी सकाळी शिंदे हे जुने रेकॉर्ड पाहण्यासाठी गेले असता, दरवाजाला आतून कडी लावल्याचे त्यांच्या लक्षात आले.


त्यांनी पाठीमागच्या बाजूला जाऊन पाहिले असता रेकॉर्ड रुमची खिडकी उघडी होती आणि तिचे लोखंडी ग्रील गायब होते. खिडकीतून आत प्रवेश केला असता, खोलीतील सामान अस्ताव्यस्त पडले होते. चोरट्याने खोलीतून सन २०२१ ते २०२२ दरम्यानचे 'एमएलसी, ओपीडी, एक्स-रे विभागाचे बांधून ठेवलेले महत्त्वाचे कागदपत्रांचे २४ गठ्ठे आणि खिडकीचे लोखंडी ग्रील चोरुन नेले असल्याचे समोर आले. ही बाब शिंदे यांनी तातडीने वरिष्ठांना कळविली. त्यांच्या सूचनेनुसार पोलिसांना माहिती देण्यात आली. ही माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, पोलीस उपनिरीक्षक दिनकर यांच्या सह पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. त्यानंतर शिंदे यांच्या फिर्यादीनुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### 'एमएलसी रिपोर्ट' असतो महत्वाचा अधिकृत पुरावा

एमएलसी म्हणजे वैद्यकीय-कायदेशीर प्रकरण, अपघात, मारामारी, विषबाधा किंवा संशयास्पद मृत्यू यांसारख्या प्रकरणांत रुग्णालयात दाखल झालेल्या व्यक्तीचे वैद्यकीय रेकॉर्ड ठेवणे आणि पोलिसांना कळवणे कायद्यानुसार बंधनकारक असते. या रेकॉर्डचा उपयोग न्यायालयीन केसेस मध्ये होत असतो. रुग्ण कोणत्याही शासकीय किंवा खाजगी रुग्णालयात आल्यावर, डॉक्टर प्राथमिक उपचारांना प्राधान्य देतात आणि लगेचच जवळच्या पोलीस ठाण्याला याची माहिती देतात. डॉक्टर एमएलसी रजिस्टरमध्ये रुग्णाच्या जखमांचा प्रकार, वेळ, आणि आणणाऱ्या व्यक्तीची माहिती नोंदवतात. मिळालेल्या एमएलसी माहितीच्या आधारे पोलीस गुन्हा दाखल करतात.

### हा तर पुरावा नष्ट करण्याचा गंभीर प्रकार

रुग्णावरील जखमा कशा झाल्या, किती गंभीर आहेत, याचा अधिकृत पुरावा म्हणून 'एमएलसी रिपोर्ट' कोर्टात वापरला जातो. खाजगी अथवा शासकीय रुग्णालयांना सर्व एमएलसी नोंदी सुरक्षित ठेवणे बंधनकारक असते. कायदेशीर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत किंवा कायद्यानुसार निर्धारित केलेल्या काळापर्यंत हे रेकॉर्ड जतन केले जात असते. जिल्हा शासकीय रुग्णालयातून हेच महत्वाचे रेकॉर्ड चोरीला गेल्यामुळे त्या काळात घडलेल्या एखाद्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा पुरावाच नष्ट करण्याचा हा प्रकार असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या चोरीच्या गुन्ह्याची तातडीने उकल होणे आवश्यक आहे.




जागतिक दृष्टीदान दिन
"मृत्युनंतरही अजरामर राहु, नेत्रदान करून पुन्हा हे जग पाहु"
नेत्रदान - सर्वश्रेष्ठ दान
मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करा.
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
Visit us at : www.saisuryasupervision.com
Help line 9112288611/ 8888982222


# राज्यात 'पेपर कप'वर 'बंदी' घालावी

## नगरमधून जागरुक नागरिक मंचची मागणी; अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना निवेदन

नगर - चहा किंवा अन्य पेयांसाठी सर्रास वापरले जाणारे पेपर कप मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक असून ते कॅन्सरसारख्या दुर्धर आजारांना आमंत्रण देत असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. या गंभीर विषयाची दखल घेऊन अमरावती, बुलढाणा, पुणे पाठोपाठ आता अहिल्यानगरमध्ये पेपर कपवर बंदी घालण्याची होत आहे. जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी यासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे सविस्तर अहवाल सादर करून सकारात्मक कार्यवाहीची मागणी केली आहे.

पत्रकात म्हटले आहे, आयआयटी खरगपूर येथील संशोधकांनी केलेल्या प्रयोगांअंती पेपर कप हे कॅन्सरला कारण ठरत असल्याचे समोर आले आहे. पेपर कपमध्ये ९५ अंश सेल्सिअस तापमानाचा गरम चहा किंवा सूप ओतल्यानंतर अवघ्या १० सेकंदात सुमारे २५ हजार टॉक्सिक मायक्रोप्लास्टिक कण चहामध्ये विरघळतात. अशा प्रकारे दिवसातून चार वेळा चहा पिणाऱ्या व्यक्तीच्या शरीरात दररोज १ लाख मायक्रोप्लास्टिक कण जात आहेत. यामुळे लिव्हर, किडनीचे विकार, हार्मोनल असंतुलन आणि अखेर कॅन्सरचा धोका वाढत असल्याचे मुळे यांनी म्हटले आहे.

देशभरात दररोज सुमारे अडीच कोटी पेपर कप आणि सव्वा दोन कोटी प्लास्टिक कप वापरले जातात. या गंभीर धोक्याची जाणीव ठेवून बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे, तसेच अमरावती आणि परभणी प्रशासनाने आपल्या कार्यक्षेत्रात पेपर कपवर बंदीचे आदेश जारी केले आहेत, तसेच, याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या बंद करण्याचे आणि साठा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही दिले आहेत. मात्र, ही कारवाई केवळ कागदावर झाली आहे. प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

झाडांची कत्तल करून बनवलेल्या या कपमुळे निसर्गाचीही हानी होत आहे. चिनी मातीचे कप, काचेचे ग्लास किंवा कुल्हड यांसारखे नैसर्गिक आणि पर्यावरणास पूरक पर्याय उपलब्ध आहेत. ते वापरण्याची सक्ती केली पाहिजे आणि लोकांनीही चहा मागताना मातीच्या किंवा काचेच्या कपात मागावा, असे आवाहनही मुळे यांनी केले आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे ग्राहकांना मोठी अपेक्षा आहे. या पेपर कपच्या अनिर्बंध वापरामुळे होणारी अदृश्य कत्तल थांबवण्यासाठी शासनाने तात्काळ कठोर पावले उचलून राज्यभरात बंदी लागू करावी, अशी मागणी मंचाने केली आहे. नागरिकांनीही आता आरोग्याच्या हितासाठी हॉटेलमध्ये पेपर कपला नकार देऊन काचेच्या किंवा मातीच्या कपचा आग्रह धरला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.




२० वे पुण्यस्मरण
***
आठवणींचा हा अथांग सागर
उसळतो नेहमी मनोमनी..
विशाल कार्याची मुर्ती तुमची
डोळ्यासमोर उभी रहाते
प्रत्येकदिनी...
***
स्व. पुंडलिकराव ऊर्फ दादा चौधरी
स्व. ११ जून २००६
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रध्दांजली..
दुःखांकित
डॉ. रवि चौधरी Mo. 98224 35090
(मा. अध्यक्ष : शिक्षण मंडळ पुणे, महानगरपालिका)
सौ. गायत्री चौधरी । मंगल सत्रे । सुनंदा सत्रे । सुरेखा चौरे, निर्मला कमोद । भारती वाघ व परिवार
श्री. चंद्रकांत सत्रे । डॉ. रणजीत सत्रे । निलेश सत्रे । नितीन चौरे । डॉ. प्रताप कमोद
चि. राजवर्धन रवि चौधरी
समस्त चौधरी, क्षिरसागर (दुवा हलवाई) आगरकर परिवार
१२०४/२३ अमित समृद्धी, बालगंधर्वसमोर, जं.म. रोड, पुणे-४.




भावपुर्ण श्रद्धांजली

क्षणोक्षणी आमच्या मनी, तुमचीच आहे आठवण,
हीच आमच्या जीवनातील, अनमोल अशी साठवण...
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
कै. नामदेवराव सहादू दळवी
स्वर्गवास दि. २ जून २०२६
॥ दशक्रिया विधी ॥
गुरुवार दिनांक ११/०६/२०२६ रोजी, वेळ : सकाळी ८.३० वा.
स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे होईल.
शोकाकुल
गं.भा. सुमन नामदेवराव दळवी
श्री. रामदास सहादू दळवी | सौ. मनिषा सुहास दळवी
श्री. अविनाश रामदास दळवी | सौ. रूपाली अजित राजगिरे
श्री. विनायक रामदास दळवी | सौ. वैशाली सचिन झगडे
श्री. सुहास नामदेवराव दळवी | सौ. दिपाली सुधीर ताम्हाणे
श्री. तेजस अजित राजगिरे | सौ. सोनल तेजस राजगिरे
कु. निकिशा सुहास दळवी । समस्त दळवी परिवार




Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now
www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
सावेडी शाखा 7447761769



॥ १० वे पुण्यस्मरण ॥

स्व. मेहरुमल सभागामल पोपटानी
स्वर्गवास दि. १०.६.२०१६
सब कुछ होने के बावजूद भी कुछ भी नही है,
ऐसा लगता है आपके बिना, यह परिवार खाली है..
आपकी पावन स्मृतिमें भावपुर्ण श्रद्धांजली..
समस्त पोपटानी परिवार
धार्मिक परिक्षा बोर्डके पास-सहकार सभागृह रोड, अहिल्यानगर



क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी

पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रँण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट,ढाइशर्ट | टिशर्ट | नाईटपॅन्ट | जिन्स,फॉर्मल पॅन्ट
7XL पर्यंत | 6XL पर्यंत | 4XL पर्यंत | 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## शेताच्या बांधाच्या वादातून तिघांना मारहाण, गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील शिराढोण गावामध्ये शेताचा सामायिक बांध कोरल्याच्या कारणावरून दोन गटात तुफान हाणामारी झाल्याची घटना ८ जून रोजी घडली आहे. या वादात आरोपींनी एका ५५ वर्षीय महिलेसह तिच्या पती व मुलाला लोखंडी गजाने व दगडाने मारहाण केली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ७ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत द्वारकाबाई किसन हिंगे (वय ५५, रा. शिरढोण, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्या शेताचा बांध कोरल्याचा जाब विचारण्यास गेल्याचा राग मनात धरून आरोपींनी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की आरोपींनी सोबत आणलेल्या लोखंडी गजाने, लाकडी काठ्यांनी आणि दगडांनी थेट हल्ला केला. यावेळी पीडित महिलेला वाचवण्यासाठी तिचे पती आणि मुलगा धावून आले असता, आरोपींनी त्या दोघांनाही काठीने आणि दगडांनी बेदम मारहाण करून जखमी केले.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी दत्तात्रय लिबराज वाघ, विजय दत्तात्रय वाघ, विशाल दत्तात्रय वाघ, अजय अशोक वाघ, अभिषेक अशोक वाघ, शंकर हरीभाऊ वाघ आणि रोहन शंकर वाघ या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## प्रमाणपत्र आणि स्टायफंडअभावी बेरोजगार तरुण शासकीय योजनांपासून वंचित; अडवणूक थांबवा, अन्यथा १९ जूनला जिल्हा उद्योग केंद्र बंद पाडणार : शिवसेना

नगर – जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोफत विशेष घटक आणि सर्वसाधारण घटक योजनेतील प्रशिक्षणार्थींची प्रशासनाकडून जाणीवपूर्वक अडवणूक केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. तांत्रिक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करूनही शेकडो तरुणांना अद्यापपर्यंत त्यांचे हक्काचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि १००० रुपयांचे विद्यावेतन (स्टायफन्ड) मिळालेले नाही. प्रशासनाच्या या बेजबाबदार कारभारामुळे संतप्त झालेल्या शिवसेना सामाजिक न्याय विभागाने आता थेट संघर्षाची भूमिका घेतली असून, १९ जूनपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास जिल्हा उद्योग केंद्राला टाळे ठोकून ते बंद पाडण्याचा इशारा दिला आहे. गोरगरीब आणि सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, यासाठी शासनाच्या वतीने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत विविध तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. अनुसूचित जाती, नवबौद्ध आणि सर्वसाधारण प्रवर्गातील अनेक तरुणांनी या योजनेचा लाभ घेत प्रशिक्षण पूर्ण केले. मात्र, प्रशिक्षण संपून मोठा कालावधी उलटल्यानंतरही जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करत आहे. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी किंवा बँकेकडून व्यवसाय कर्ज घेण्यासाठी हे प्रमाणपत्र अत्यंत आवश्यक आहे. मात्र, ते वेळेत न मिळाल्याने हे तरुण शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांपासून जाणीवपूर्वक वंचित राहिले असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.


बेरोजगार तरुणांना शासकीय योजनांपासून वंचित ठेवू नये, या मागणीचे निवेदन शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्यावतीने प्रशासनाला देण्यात आले.

### मागण्या पूर्ण कराव्या : विनोद साळवे

शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाप्रमुख विनोद साळवे म्हणाले की, प्रशिक्षणार्थींची ही अडवणूक शिवसेना कदापि खपवून घेणार नाही. तरुणांनी आपले प्रशिक्षण प्रामाणिकपणे पूर्ण केले आहे, मग त्यांचे प्रमाणपत्र आणि स्टायफन्ड अडवून ठेवण्याचे कारण काय? जिल्हा उद्योग केंद्र सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्याऐवजी त्यांच्या अडचणीत भर घालत आहे. आम्ही प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगू इच्छितो की, १९ जूनपर्यंत सर्व प्रशिक्षणार्थींच्या खात्यात स्टायफन्ड जमा झाला पाहिजे आणि त्यांना सन्मानाने प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. जर १९ तारखेपर्यंत मागणी पूर्ण झाली नाही, तर शिवसेना स्टाईलने जिल्हा उद्योग केंद्राला टाळे ठोकले जाईल आणि ते पूर्णपणे बंद पाडले जाईल. यानंतर निर्माण होणाऱ्या तीव्र जनक्षोभाला आणि कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला सर्वस्वी शासन आणि येथील निकम्मे प्रशासनच जबाबदार असेल.

याप्रसंगी छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सचिव विजय लोंढे, सुभाष काकडे, महिला जिल्हाप्रमुख सामाजिक न्यायविभाग कावेरी भिंगारदिवे, उज्वला गवळी, संदीप काकडे, संगीता केदारी, श्रीधर शेलार, ज्योती वाघ आदी उपस्थित होते.

## धनादेश अनादर प्रकरणांसाठी १८ जुलैला विशेष लोकअदालत

नगर – धनादेश अनादर (चेक बाऊन्स) आणि दाखलपूर्व प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यासाठी जिल्ह्यात १८ जुलै रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून संबंधित पक्षकार, बँका, वित्तीय संस्था तसेच विधिज्ञांनी सहभागी व्हावे व या विशेष संधीचा लाभ घेऊन तडजोडीद्वारे वाद मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे.


राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. बी. कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकअदालतीमध्ये निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेली धनादेश अनादराची प्रकरणे तसेच त्यासंदर्भातील दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल.

प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी संबंधित पक्षकारांनी आपले प्रकरण ज्या न्यायालयात सुरू आहे तेथे अर्ज सादर करावेत. तसेच दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावेत, असेही कळविण्यात आले आहे.

## चांदणी चौक ते जुने कलेक्टर ऑफिस मार्गावर कचऱ्याचे ढीग

### कचऱ्याचे ढीग न उचलल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा



नगर – शहरात मागील आठवड्यात झालेल्या वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे पडून विद्युत पुरवठा विस्कळीत झाला होता. हा पुरवठा सुरळीत करण्यासाठी महापालिका आणि महावितरणच्या पथकांनी झाडांच्या फांद्या छाटून रस्ते मोकळे केले होते. मात्र, चांदणी चौक ते जुन्या कलेक्टर ऑफिस या महत्त्वाच्या मार्गावर छाटलेल्या झाडांचा कचरा चार-पाच दिवस उलटूनही उचलला गेलेला नाही. या ढिसाळ कारभाराबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष युवक काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, दोन दिवसांत कचरा न उचलल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

जुन्या कलेक्टर कचेरीत दस्त नोंदणी आणि इतर महत्त्वाच्या कामांसाठी संपूर्ण जिल्ह्यातून नागरिक येत असतात. याच मार्गावर वादळामुळे पडलेल्या झाडांच्या फांद्या छाटल्यानंतर त्या तिथेच पडून आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठी अडचण निर्माण होत असून अपघाताचाही धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी या समस्येबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष रोहन शेलार आणि नितीन खंडागळे यांच्याशी संपर्क साधून तक्रार केली होती.

नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत रोहन शेलार यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यानंतर त्यांनी तातडीने मनपाच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून हा कचरा त्वरित उचलण्याची मागणी केली. शेलार म्हणाले की, प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. जर येत्या दोन दिवसांत रस्ता साफ न केल्यास, राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## ट्रकमधून बॅटऱ्यांची चोरी

नगर – केडगाव परिसरातील चेट्टिनाड सिमेंट गोदामासमोर पार्क केलेल्या एका १० टायर ट्रकच्या दोन महागड्या बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राम सर्जेराव सकट (वय ३८, रा. बोहरी चाळ, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ते गेल्या दोन वर्षांपासून अमोल लड्डा (रा. बार्शी) यांच्या मालकीचा अशोक लेलंड कंपनीचा १० टायर ट्रक (क्र.एमएच १५ यु ५१४७) चालक म्हणून काम करतात. त्यांनी ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता हा ट्रक केडगाव औद्योगिक क्षेत्रातील चेट्टिनाड सिमेंट गोदामाजवळ पार्क केला होता आणि ते घरी निघून गेले होते. दुसऱ्या दिवशी ९ जून रोजी सकाळी १० वाजता जेव्हा ते ट्रक घेण्यासाठी घटनास्थळी परत आले, तेव्हा त्यांना ट्रकच्या दोन्ही बॅटऱ्या गायब असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सरस्वतीबाई भोसले यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – बुरुडगाव रोड, भोसले आखाडा येथील रहिवासी सरस्वतीबाई दामोधर भोसले (वय ९०) यांचे १० जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. नामदेव (तात्या), ज्ञानेश्वर, दिलीप भोसले यांच्या त्या मातोश्री तर माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या त्या चुलती होत.



## अमृतलाल गुगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सावरगाव येथील रहिवासी अमृतलाल खिवराज गुगळे (सावरगाववाले) (वय ६३) यांचे १० जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १० जून रोजी सावरगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, ४ भाऊ, सुना, नातवंडे, जावई, ५ बहिणी असा परिवार आहे. रमेशलाल, सुभाषलाल, इंद्रभानलाल, प्रदीपलाल गुगळे यांचे ते बंधू होत.

## रमनलाल संचेती यांचे दु:खद निधन

नगर – सारोळा कासार येथील मूळ रहिवासी सध्या घोडनदी (शिरूर) येथे स्थायिक असलेले रमनलाल रायचंद संचेती (वय ८५) यांचे हृदयविकाराने निधन झाले.



त्यांच्या मागे प्रकाशलाल, रसिकलाल, ईश्वरलाल संचेती हे बंधू, दोन बहिणी, चिरंजीव प्रशांत संचेती, सौ.शोभा कर्नावट, सौ.सुवर्णा सुराणा, सौ. तृप्ती दुधेडिया या मुली, भाजपा अहिल्यानगर शहर मध्य मंडळ उपाध्यक्ष पियूष संचेती, प्रितम संचेती, चिराग संचेती, उत्कर्ष संचेती हे पुतणे, ऋषभ, आयुष, आदित्य, सम्यक, हर्ष, जय हे नातवंडे तर ३ जावई, सुना असा परिवार आहे.

## सौ.कमलबाई वलटे यांचे दु:खद निधन

श्रीरामपूर – नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथील सौ.कमलबाई बापूसाहेब वलटे (वय ७३) यांचे दु:खद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, २ मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. बापूसाहेब वल्टे यांच्या त्या पत्नी, जयदास वलटे, मंजुषा झिंजुर्डे तसेच अकोले येथील प्राथमिक शिक्षिका सुनिता देशमुख यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## प्रत्येक गावातील हिंदूंनी आता संघटित होऊन मंदिरांमधून धर्माचा संदेश देण्यास सुरुवात करावी : आ.संग्राम जगताप

### येत्या अधिवेशनात 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करण्याची मंदिर विश्वस्तांची मागणी

नगर – मंदिरे ही हिंदु धर्माची प्रमुख केंद्रस्थाने असून प्रत्येक गावातील हिंदूंनी संघटित होऊन मंदिरांमधून धर्माचा संदेश देण्यास सुरुवात करावी. इतर धर्मीयांचे संदेश किंवा फतवे अल्पावधीत देशभर पोहोचतात, त्याच धर्तीवर हिंदूंनीही प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज आहे. अनेक गावांत मूळच्या यात्रा बंद होऊन उरूस सुरू झाले आहेत, ते बंद करून गावोगावी पुन्हा यात्रा सुरू कराव्यात. याशिवाय काही हिंदु देवस्थानांचे दर्यामध्ये रूपांतर करण्यात आले आहेत. अशी स्थळे हिंदूंनी पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अहिल्यानगर येथील टिळक रोडवरील पटेलवाडी मंगल कार्यालय येथे ८ जूनला आयोजित 'देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत' ते बोलत होते. या वेळी 'मंदिर महासंघा'चे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांची प्रमुख उपस्थिती होती.


महाराष्ट्र मंदिर महासंघ आयोजित 'देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत' बोलताना आ. संग्राम जगताप.

या वेळी सुनील घनवट म्हणाले की, हिंदू मंदिरांच्या व्यवस्थापनाच्या संदर्भातील प्रश्नांवर हिंदु समाजाने अधिक सजग होण्याची गरज आहे. सर्व मंदिरे ही भक्तांकडे सोपवली जावीत, तसेच राष्ट्रीय पातळीवर 'सनातन बोर्ड'ची स्थापना व्हावी. मंदिरांशी संबंधित व्यवसाय श्रद्धावान हिंदूंच्या माध्यमातून चालवण्याबाबत मढी देवस्थानच्या धर्तीवर निर्णय घेण्याचे आवाहनही त्यांनी या वेळी केले. सरकारने सध्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' या कायद्याला स्थगिती दिली असली, तरी पुढील काळात हा कायदा लागू होऊ नये, यासाठी मंदिर विश्वस्त, पुरोहित आणि संबंधित घटकांनी एकत्रित राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या परिषदेस ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, मुकुल गंधे (भाजपा कार्यालयीन मंत्री), महादेव कोकाटे (मढी देवस्थान कार्याध्यक्ष), नवनाथ आव्हाड (मोहटा देवी देवस्थानचे माजी विश्वस्त), भरत शिंदे (जिल्हा संयोजक, मंदिर महासंघ महाराष्ट्र), जिल्हा कायदेशीर सल्लागार ॲड. नामदेव जायभाये, ॲड. नवनाथ तांदळे, बाळासाहेब अकोलकर (अध्यक्ष, श्री उत्तरेश्वर देवस्थान, करंजी), श्री विशाल गणपती देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, गणेश पलंगे (महाराष्ट्र मंदिर महासंघ, जिल्हा सहसंयोजक), सुनील शिंदे (महाराष्ट्र मंदिर महासंघ, शहर संयोजक) यांच्यासह विविध मंदिरांचे विश्वस्त, पुरोहित, पुजारी आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या परिषदेत जिल्ह्यातील मंदिर महासंघाच्या कार्याचा आढावा बापू ठाणगे यांनी सादर केला तर इनाम जमिनीविषयी धर्मशास्त्रीय दृष्टीकोन रामेश्वर भूकन यांनी मांडला. हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे अजिंक्य गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. हिंदू मंदिरांच्या लक्षावधी एकर देवस्थान जमिनी आज विविध कारणांमुळे धोक्यात आल्या आहेत. मंदिरांच्या भूमीवर होणारी परकीय धार्मिक अतिक्रमणे आणि वक्फ बोर्डाकडून बळकावल्या जाणाऱ्या हिंदूंच्या जमिनी हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. हे संकट रोखण्यासाठी शासनाने आगामी अधिवेशनात कठोर 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' (देवस्थान भूमी संरक्षण कायदा) लागू करावा, अशी मागणी मंदिर परिषदेत करण्यात आली.

## शंकर व्यापारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष, विद्या विहार सोसायटी दिल्ली गेटचे माजी सेक्रेटरी, शंकर भास्कर व्यापारी (वय ९९) यांचे १० जून रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. व्यापारी सर हे जवळपास ३० वर्ष श्री समर्थ विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष होते तसेच वीस ते पंचवीस वर्षे विद्याविहार सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी पद भूषविले. अत्यंत शांत संयमी हुशार व्यक्तिमत्व म्हणून त्यांची अहिल्यानगर शहरात ख्याती होती.

## अहिल्यानगर शहरात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांना आठ दिवसात आकारला ११ लाखांचा दंड

नगर – शहरात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध शहर वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. १ जून ते ८ जून या आठ दिवसांच्या कालावधीत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना तब्बल ११ लाख ४ हजार ७५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. यातील ८९ हजार १०० रुपये दंड रोख स्वरुपात वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिली.



वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी शहर वाहतूक शाखेत आणलेली वाहने.

वाहतूक शाखेने दिलेल्या माहितीनुसार, मागील आठ दिवसांच्या काळात एकूण १७९ ई-चलान फाडण्यात आली आहेत. हेल्मेट न वापरणाऱ्या २९ वाहन चालकांकडून २९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, अवैध प्रवासी वाहतुकीचे २० गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. मद्यपान करून वाहन चालवल्याप्रकरणी एका चालकावर कारवाई करून त्याला १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. याव्यतिरिक्त विनापरवाना वाहन चालवणे, ट्रिपल सीट प्रवास, धोकादायक पद्धतीने वाहन चालवणे आणि वाहनांमध्ये अनधिकृत बदल (उदा. काळी काच, फॅन्सी नंबर प्लेट, सायलेन्सर बदलणे) करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत एकूण ८९ हजार १०० रुपये रोख दंड वसूल करण्यात आला असून, एकूण ११ लाख ४ हजार ७५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने पार पाडली.

पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये, वैध वाहन परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये, वाहन चालवताना परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, विमा आणि प्रदूषण प्रमाणपत्र सोबत ठेवावे, वाहनांवर काळी काच लावू नये आणि फॅन्सी नंबर प्लेट किंवा अनधिकृत बदल करू नयेत, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास टाळावा आणि हेल्मेटचा वापर करावा. चारचाकी चालकांनी सीट बेल्ट लावणे अनिवार्य आहे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा, वेगमर्यादेचे पालन करावे आणि ट्रॅफिक सिग्नल व झेब्रा क्रॉसिंगचे नियम पाळावेत, वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन शहर वाहतूक शाखेतर्फे करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### टाचांच्या भेगांवर घरगुती उपय

उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे टाचांना भेगा पडू लागतात. जर या समस्येकडे वेळेवर लक्ष दिले नाही, तर भविष्यात अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. जेव्हा त्यांना जास्त भेगा पडतात, तेव्हा वेदना ही एक सामान्य समस्या आहे. उन्हाळा असो वा हिवाळा, घरातील कामे आणि बाहेरील धुळीमुळे टाचांना भेगा पडू लागतात, पण आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. कारण आज आम्ही तुम्हाला काही सोप्या पद्धती सांगणार आहोत, ज्यांचा अवलंब करून तुम्ही यावर उपाय करू शकता. जर तुमच्या टाचांना भेगा पडल्या असतील, तर झोपण्यापूर्वी तुम्ही त्यांना खोबरेल तेल किंवा तूप लावू शकता. तुमच्या इच्छेनुसार, तुम्ही ग्लिसरीन आणि गुलाबजल समान प्रमाणात मिसळून ते तुमच्या टाचांना लावू शकता. यामुळे तुमच्या पायांमधील ओलावा टिकून राहण्यास आणि ते मऊ राहण्यास मदत होते. तुमच्या टाचा मऊ आणि चमकदार बनवण्यासाठी तुम्ही लोणी किंवा मलईचा वापर देखील करू शकता. मीठ नसलेले लोणी किंवा मलई लावा. आधी तुमचे पाय धुवा, नंतर ते व्यवस्थित चोळून घ्या आणि मग मोजे घाला. तुम्ही झोपण्यापूर्वी पाण्याने पाय धुवून त्यावर जाड मलई लावू शकता. जर तुमच्या टाचांना खोल भेगा पडल्या असतील, तर त्या लवकर बऱ्या करण्यासाठी तुम्ही बाजारातून खास क्रीम विकत घेऊ शकता. ही क्रीम विशेषतः भेगा पडलेल्या टाचांसाठीच तयार केलेली असते. तुम्ही ती आठवड्यातून एकदा तुमच्या टाचांना लावू शकता. जर तुमच्या तळपायांना पडलेल्या भेगा फार खोल नसतील, तर तुम्ही वर सांगितलेल्या पद्धती वापरून पाहू शकता.

## पाककला

### क्रीमी मिल्क पुडिंग

**साहित्य :** २ कप दूध, ३ चमचे कॉर्न फ्लोअर, ४ चमचे साखर, १ चमचा व्हॅनिला एसेन्स आणि आवडीनुसार चॉकलेट सिरप.

**कृती :** एका बाऊलमध्ये थोडे थंड दूध घेऊन त्यात कॉर्न फ्लोअर व्यवस्थित मिक्स करून घ्या (गाठी राहू देऊ नका). उरलेले दूध आणि साखर एकत्र करून गॅसवर उकळायला ठेवा. दूध उकळल्यावर त्यात कॉर्न फ्लोअरचे मिश्रण हळूहळू ओता आणि सतत ढवळा. मिश्रण घट्ट आणि चमकदार झाल्यावर गॅस बंद करा आणि व्हॅनिला एसेन्स टाका. हे मिश्रण लहान वाट्यांमध्ये किंवा मोल्डमध्ये काढून फ्रिजमध्ये २ तास थंड होऊ द्या आणि नंतर सर्व्ह करा.

## वास्तू

### असा ठेवा सोफा

* सोफा नेहमी हॉलच्या दक्षिण किंवा पश्चिम भिंतीला लागून ठेवा.
* घरातील मुख्य व्यक्तीने दक्षिणेकडे तोंड करून बसावे, म्हणजे स्थिरता येते.
* घराचे मुख्य प्रवेशद्वार सोफ्यावरून थेट दिसेल असा सोफा ठेवू नका. ऊर्जा बाहेर जाते.
* सोफा एल आकारात असेल तर तो ईशान्य कोपऱ्यातून सुरू करू नका. दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात एल आकार उत्तम.
* सोफ्याचा रंग हलका असावा. क्रीम, बेज, हलका तपकिरी, पिवळा रंग शुभ.
* सोफा तुटलेला, फाटलेला किंवा आवाज करणारा नसावा. याने घरात भांडणे होतात.

## सौंदर्य

* सकाळी एक बर्फाचा खडा स्वच्छ कापडात गुंडाळून १ मिनिट चेहऱ्यावर फिरवा. पोअर्स लहान होतात, सूज उतरते आणि मेकअप आधी केलं तर ग्लो येतो. थेट बर्फ लावू नका.
* मॉइश्चरायझर लावताना खालून वर आणि आतून बाहेर बोटांनी मसाज करा. गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध दिशा. २ मिनिटे रोज केलं तर चेहरा लिफ्टेड दिसतो.

## सल्ला

सिंक चोकअप झाला असेल तर १ कप खायचा सोडा + १ कप व्हिनेगर सिंकमध्ये ओता. १५ मिनिटांनी गरम पाणी ओता. प्लंबर बोलवायची गरज नाही. फेस येईल परंतु घाबरून जाऊ नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ११ जून २०२६

**कमला एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, रेवती ०८।१७, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात नवीन संधी मिळेल. रागावर नियंत्रण ठेवा. प्रवासाचे योग.

**वृषभ :** आर्थिक लाभाचे संकेत. कुटुंबासोबत वेळ घालवा. तब्येत सांभाळा.

**मिथुन :** जुन्या मित्राची भेट होईल. बोलण्यातून गैरसमज टाळा. शुभ दिवस.

**कर्क :** मन प्रसन्न राहील. घरातील कामात यश. खर्च वाढेल.

**सिंह :** नोकरीत कौतुक होईल. जोडीदाराचा सल्ला घ्या. आत्मविश्वास वाढेल.

**कन्या :** गुंतवणुकीसाठी चांगला दिवस. विद्यार्थ्यांना यश. डोकेदुखी संभवते.

**तूळ :** अडकलेली कामे मार्गी लागतील. प्रेमात गोडवा. वाहन जपून चालवा.

**वृश्चिक :** वादापासून दूर रहा. अचानक धनलाभ होईल. आईची काळजी घ्या.

**धनु :** नवीन ओळख फायदेशीर ठरेल. आळस टाळा. धार्मिक कार्यात मन रमेल.


**मकर :** मेहनतीचे फळ मिळेल. सरकारी कामात यश. पोटाचे विकार जपा.

**कुंभ :** कल्पना शक्ती वाढेल. मुलांकडून आनंदाची बातमी. उधार देऊ नका.


**मीन :** मन भावनिक होईल. नोकरीत बदलाचे संकेत. देवाचे नाव घ्या. मागील उधारी वसुल होईल.

# शब्दगंध क्र. ७४४९

सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७४४८ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) सरकारमधील सर्वोच्च लोकप्रतिनिधीवर अंकुश ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेले एक पद ६) काख ७) प्रामाणिक; गरीब; सावकार ८) दुर्दैवी; हतभागी; कमनशिबी ११) एक समसंख्या १३) तपास; शोध; पत्ता १४) स्तुती; प्रशंसा १६) विटीदांडूच्या खेळात दांडूने विटी जेथून कोलतात तो छोटा खड्डा १८) दहा तोंडाचा लंकेचा राजा १९) ओढा; रोख ; झोक २०) दक्ष; हुशार २१) तागाचे केलेले जाड कापड २२) साह्य; सहकार्य २३) लढाई; लढाईचे मैदान; वाळू; युद्धभूमी

**उभे शब्द :-** १) जुलमी : श्रेष्ठ: खंबीर २) वस्तुः पर्वत; डाग ३) दागिन्यातला लोंबता लांबट पाणी ४) विस्तार (कंटाळा येईल असे बोल) ५) विशेषतः इशारा देणारा झेंडा ७) आंब्याचे जाळे; गायनातील एक राग; मोर; हत्ती; हरिण; कोकिळ ९) भिंतीचा जमिनीतील भाग १०) जास्तीतजास्त ; अतिशयपणा १२) तीव्र इच्छा; लोभ १५) माणसांतील अधम १६) नातेवाईक; नातलग १७) तीनशेपासून हजारापर्यंत पायदळाची तुकडी १९) डोंगरातील खोलगट जागा किंवा खबदड २०) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** जिंकणाऱ्यांना बहाणे नसतात, आणि बहाणे सांगणारे जिंकत नसतात.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## शरीराला खाज का येते?

खाज येणे ही शरीराची एक संरक्षण यंत्रणा आहे. आपल्या त्वचेमध्ये लाखो सूक्ष्म मज्ञातंतू असतात. जेव्हा त्वचेवर धूळ, किडा, किंवा कोणताही बाहेरचा कण बसतो तेव्हा हे मज्ञातंतू लगेच मेंदूला सिग्नल पाठवतात. मेंदूला वाटते की त्वचेवर काहीतरी धोका आहे आणि तो आपल्याला खाजवायला लावतो. खाजवले की तो कण किंवा किडा निघून जातो. म्हणून खाज येणे हे नैसर्गिक आहे. त्वचेमध्ये हिस्टामीन नावाचे रसायन असते. जेव्हा ॲलर्जी होते तेव्हा शरीर हिस्टामीन सोडते. हिस्टामीनमुळे त्वचेखालच्या रक्तवाहिन्या फ ुगतात आणि मज्ञातंतूंना चालना मिळते. त्यामुळे खाज सुटते. डास चावल्यावर हेच घडते. डासाची लाळ शरीराला बाहेरची वस्तू वाटते. त्यामुळे हिस्टामीन सुटते आणि आपण खाजवतो.

कोरड्या त्वचेमुळे पण खूप खाज येते. हिवाळ्यात हवेतील आर्द्रता कमी होते. त्वचेतील पाणी कमी झाल्याने त्वचा तडकते. त्या छोट्या भेगांमुळे मज्ञातंतू उघडे पडतात. हवेचा साधा स्पर्श झाला तरी खाज सुटते. म्हणून हिवाळ्यात खाज जास्त येते. साबणाचा अतिवापर केल्याने पण त्वचेतील नैसर्गिक तेल निघून जाते आणि कोरडेपणा वाढतो.

काहीवेळा ताणतणावामुळे पण खाज येते. मेंदू आणि त्वचा यांचा थेट संबंध असतो. जास्त टेन्शन आले की शरीरात काही रसायने स्त्रवतात. त्यांचा परिणाम त्वचेवर होतो. मज्ञातंतू जास्त संवेदनशील होतात आणि विनाकारण खाज सुटते. याला सायकोजेनिक इच म्हणतात. परीक्षेच्या वेळी किंवा चिंतेत असताना अनेकांना डोक्याला खाज येते ते यामुळेच. घाम, उष्णता आणि कपड्यांचे घर्षण यामुळे पण खाज येते. घट्ट कपडे घातले की त्वचा श्वास घेऊ शकत नाही. घाम तिथेच साचतो. त्यातले क्षार त्वचेला टोचतात. म्हणून घामोळे आल्यावर खाज सुटते. लोकर किंवा काही कृत्रिम कपड्यांचे धागे टोचरे असतात. त्यामुळे पण मज्ञातंतू उत्तेजित होतात.

शरीराच्या आतल्या काही आजारांमध्ये पण खाज हे लक्षण असते. यकृत नीट काम करत नसेल तर रक्तात पित्त क्षार वाढतात. मधुमेहात साखर वाढल्याने त्वचा कोरडी पडते. किडनीच्या विकारात शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर पडत नाहीत. हे सर्व घटक रक्तातून त्वचेपर्यंत पोहोचतात आणि मज्ञातंतूंना खाजवायचा संदेश देतात. म्हणून खूप दिवस सतत खाज येत असेल तर दुर्लक्ष करू नये. खाजवणे हे तात्पुरते बरे वाटते. कारण खाजवले की मेंदूला वेदनेचा सौम्य सिग्नल जातो.

वेदनेचा सिग्नल खाजेच्या सिग्नलपेक्षा जास्त तीव्र असतो. त्यामुळे मेंदू काही काळ खाज विसरतो. पण जास्त खाजवले की त्वचा सोलवटते. तिथे जखम होते आणि जंतुसंसर्ग होऊ शकतो. म्हणून खाज आली तरी जोरात न खाजवता थंड पाणी लावणे किंवा बर्फ शेकणे चांगले. थोडक्यात, खाज म्हणजे त्वचेने मेंदूला दिलेला धोक्याचा इशारा आहे. कधी तो बाहेरच्या कणाचा असतो, कधी कोरडेपणाचा, कधी ॲलर्जीचा आणि कधी शरीरातील अंतर्गत बिघाडाचा. म्हणून खाजेकडे लक्ष देणे गरजेचे असते. पण सतत आणि तीव्र खाज असेल तर डॉक्टरांना दाखवावे.

## गाणारा गाढव

एका गावात रामू नावाचा धोबी राहत होता. त्याच्याकडे एक गाढव होते. दिवसभर ते गाढव धोब्याची ओझी वाहायचे आणि रात्री मोकळे सुटल्यावर शेतात चरायला जायचे. तिथे त्याची एका हुशार कोल्ह्याशी मैत्री झाली. दोघे रोज रात्री भेटत आणि एकत्र मजा करत.एकदा दोघे काकडीच्या शेतात शिरले. गाढवाने मनसोक्त काकड्या खाल्ल्या. पोट भरल्यावर तो खूप खूश झाला आणि कोल्ह्याला म्हणाला, मित्रा, आज माझा मूड खूप छान आहे. माझा आवाजही फार गोड आहे. तुला एक सुंदर गाणं ऐकवू का? हे ऐकून कोल्हा घाबरला.

तो म्हणाला, अरे मूर्खा, आता मध्यरात्र झाली आहे. तू ओरडलास तर शेतकरी जागा होईल आणि आपल्या दोघांनाही मार बसेल. गाण्याची ही वेळ नाही. पण गाढवाला त्याचे काही पटेना. तो म्हणाला, तुला कलेतले काय कळते? खरा कलाकार वेळ बघत नाही. मला आता गायचेच आहे. कोल्ह्याने त्याला खूप समजावले, पण गाढव ऐकायला तयारच नव्हते. शेवटी गाढवाने डोळे मिटले आणि मोठ्या आवाजात ढेंचू-ढेंचू करून ओरडायला सुरुवात केली. तो आवाज ऐकताच कोल्ह्याने तिथून पळ काढला.

गाढवाच्या ओरडण्याने शेतकरी खडबडून जागा झाला आणि हातात काठी घेऊन शेताकडे धावला. शेतात आल्यावर त्याला सगळ्या काकड्यांचा नाश झालेला दिसला आणि मध्ये हे गाढव गाणे गात होते. संतापलेल्या शेतकऱ्याने गाढवाला काठीने इतके चोपले की त्याचे अंग निळे-निळे झाले. मार खाऊन रडत-रडत गाढव सकाळी कोल्ह्याला भेटायला गेले.

कोल्हा त्याला बघून हसत म्हणाला, काय रे गायक महाराज, कसं झालं कालचं मैफिलीचं? गाढव खजील होऊन म्हणाले, मित्रा, माझी चूक झाली. तुझं ऐकायला हवं होतं. त्यावर कोल्हा म्हणाला, लक्षात ठेव, प्रत्येक गोष्टीला योग्य वेळ आणि जागा असते. अयोग्य वेळी शहाणपणा दाखवला तर नुकसानच होते.

बोध: हितचिंतक मित्राचा सल्ला ऐकावा आणि वेळ, काळ, परिस्थिती पाहूनच कृती करावी.

# आत्मशक्ति



### आत्मिक ध्यान

आत्मिक धनापर्यंत पोहोचण्याची क्रिया सरळ आहे. ह्याकरीता आम्हाला सृष्टीभ्रमण, अंतरिक्षामध्ये उडण्याची आवश्यकता नाही. ह्या विधीचा अभ्यास आम्ही आपल्या घरात बसून ध्यानाद्वारे करू शकतो. याद्वारेच आमचे जीवन सर्व बाजूंनी समृध्द झालेले दिसेल. अशी ही समृध्दता व्यक्तिगत संबंधांबाबत असेल, नोकरीबद्दल असेल किंवा भौतिक, मानसिक, भावनात्मक, अध्यात्मिक अथवा आरोग्याबद्दल असेल. जीवनाचे ध्येय प्राप्त करून घेण्यातही असेल! हा बदल केवळ आमचे जीवन आनंदी व शांती मिळविण्यात सहाय्य करणार नाही, तर साऱ्या जगात शांती आणि प्रेमाचे वातावरण निर्माण करण्यासाठीही उपयोगी पडेल. ह्या पुस्तकाचा उद्देश आत्म्याचे सत्य स्वरुप जाणण्यासाठी आहे. आम्ही कोणत्या पध्दतीने साधन अभ्यास करावा हे शिकण्यासाठी आहे. आम्ही जाणले पाहिजे की मन आणि शरीर हे फक्त बाहेरचे आवरण आहे ज्याद्वारे आम्ही ह्या संसारातील कार्य करतो. आम्ही आत्मा असून आम्हाला आपल्या आत्म्याला जागृत करावयाचे आहे. ज्यामुळे आमचे जीवन आनंदमय होईल. हे ही आम्हाला ह्या पुस्तकावरून समजेल ! जागृत आत्मा म्हणजे काय? या अमर्यादित ज्ञानाचे मूळ कोणते? आत्म सर्वत्र आहे कारण की तो परमात्म्याचा अंश आहे. परमात्म्यावर ज्याचा विश्वास आहे तो जाणतो, की परमात्मा सर्वज्ञ आहे. आईबाप मुलांना म्हणत असतात, बाळांनो, सावध असा! परमात्मा तुमच्या प्रत्येक विचारांकडे, बोलण्याकडे आणि कर्माकडे लक्ष देत आहे. बायबलच्या जुन्या करारात आले आहे, की स्त्री पुरुषांना (आदम आणि हव्वा) जीवनाची फळे खाण्यास परमेश्वराने सक्त मनाई केली, तरीही त्यांनी प्रभुचे ऐकले नाही; फळे खाल्लीच. ही गोष्ट परमेश्वरापासून लपविण्याचे त्यांनी फार प्रयत्न केले, परंतु परमात्मा सर्वज्ञानी असल्याने त्यांचे प्रयत्न असफल झाले. परमेश्वराने त्यांना अदनच्या बागेतून बाहेर हाकलून दिले आणि तेव्हापासून आम्ही त्यांची मुले परमेश्वराच्या बागेकडे जाण्याचा मार्ग शोधीत आहे. (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### देवाण-घेवाण

शिवानीदीदी :

कारण लहान मुलाला काहीतरी मिळवायचंय ही जाणीव नसते. त्याला अजून त्याच्या शरीराबद्दलही प्रेम निर्माण झालेलं नसतं. त्यामुळे ते शुद्ध आणि निरागस असतं. पण जसजसं ते बाळ मोठं होत जात तसतसं एकेक गोष्ट मिळवत जातं आणि त्याचा अहंकार विकसित होतो. आपण मिळवलेल्या गोष्टींची आवरणं आपण स्वत:पासून वेगळी करत गेलो, तर आपण आपल्या आत्म्यापर्यंत म्हणजेच मूळ स्वभावापर्यंत पोहोचतो. मुळात आपण जसे आहोत तसं राहण्याची गरज आहे. एक फूल त्याच्या मूळ गुणधर्माला धरून राहतं तेव्हा ते अधिक सुगंधित होतं.

सुरेश ओबेरॉय :

फूल मृतात्म्याला वाहिलेल्या पुष्पचक्रात असलं किंवा देवाला वाहिल्या जाणाऱ्या हारात असलं, तरी त्याला फरक पडत नाही.

शिवानीदीदी : आत्मासुद्धा फुलासारखा असायला हवा - सुंदर आणि सुगंधी सहज भावाने प्रकाशित होणारा. जेव्हा आपण इतरांकडून काही मिळायला हवं असा विचार करतो तेव्हा आपण याविरुद्ध जातो. नात्यांमध्ये देवाणघेवाण असते असं आपण नेहमी ऐकतो आणि हा समज आपल्यात खोलवर रुजलेला आहे. मी इतरांना खूप आदर आणि प्रेम दिलं, मी त्यांच्या बरोबर खूप तडजोडी केल्या, त्यांना सहकार्य केलं पण त्याच्या बदल्यात त्यांनी मला काय दिलं? असा विचार आपण करायला लागलो आहोत. याचा अर्थ हे देवाण-घेवाणीसारखं, एखादा व्यवहार असल्यासारखंच आहे.

सुरेश ओबेरॉय : आजकाल लोक त्यांना मिळालेल्या भेटीची किंमतही बघतात जेणेकरून त्यांना रिटर्न गिफ्टची किंमत ठरवता येईल.

शिवानीदीदी :

ही देवाण-घेवाण तरीही वस्तुनिष्ठ आहे. पण आता तर हा भाव सूक्ष्म पातळीवरही गेला आहे. मी त्याचं अनेक वेळा ऐकलं पण त्यांनी माझं किती वेळा ऐकलं? मी तडजोडी केल्या, आदर केला, विश्वास ठेवला पण त्यांनी हे सगळं केलं का? असा विचार आपण करायला लागलो की ही देवाण-घेवाण वस्तू, नैतिकता, व्यावहारिकता एवढ्यापुरतीच मर्यादित राहत नाही तर नात्यांमध्ये ऊर्जेच्या देवाण-घेवाणीपर्यंत पोहोचते. नात्यांमध्ये आपल्याला आपला वाटा मिळाला नाही करतो. तर आपण आपल्याच ऊर्जेमध्ये अडथळा आणून स्वतः ची घुसमट (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

प्रेयकर : बेबी, तुझ्यासाठी चंद्र-तारे तोडून आणीन.

प्रेयसी : नको रे, ते Meesho वर स्वस्त मिळतात. तू फक्त माझ्या कार्टमधलं सगळं ऑर्डर कर.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतीय राज्यघटना कोणत्या दिवशी लागू झाली?

– २६ जानेवारी १९५०

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### दुधी भोपळा

२) दुधी भोपळा हा धातुपुष्टीकर असल्याकारणाने गर्भवती स्त्रीने आहारामध्ये दुधीचे सेवन नियमित करावे. यामुळे गर्भवतीचे आरोग्य चांगले राहून गर्भाचे पोषणही व्यवस्थित होते. तसेच गर्भावस्थेमध्ये वारंवार होणारा मलावष्टंभाचा त्रासही दूर होतो. ३) उष्णतेमुळे शरीराची लाही लाही होत असेल, तर दुधीचा रस खडीसाखर घालून प्यावा. यामुळे उष्णतेचा त्रास कमी होतो.

४) स्थूल व्यक्तींनी वजन कमी करण्यासाठी रोज संध्याकाळी जेवणापूर्वी दुधीचे सूप प्यावे. या सुपाला सैंधव, जिरे, हळद, मीठ व गायीच्या तुपाची फोडणी द्यावी. यामुळे पोट भरल्याची भावना निर्माण होते व शरीरास सर्व पोषक घटकही मिळतात.

५) अति उष्णता, जुलाब, आम्लपित्त, मधुमेह, अति तेलकट खाणे यामुळे जर वारंवार तहान लागत असेल, तर अशा वेळी ग्लासभर दुधीचा रस चिमूटभर मीठ घालून घ्यावा. यामुळे घामातून शरीराबाहेर जाणारे क्षार कमी होतात, तहान लागणे कमी होते व थकवा जाणवत नाही. शांत झोप येत नसेल तर अशा वेळी दुधी भोपळ्याच्या रसाने तयार केलेले तेल डोक्याला व तळपायाला लावावे. हे तेल बनविताना दुधी भोपळ्यासोबत त्याची पाने व फुलेही घ्यावीत. या तेलामुळे थंडावा निर्माण होऊन शांत झोप लागते. ७) लघवीला जळजळ होत असेल, तर अशा वेळी ग्लासभर दुधी रस त्यामध्ये अर्धे लिंबू पिळून घ्यावा. यामुळे मूत्रातील अतिरिक्त आम्लाचे प्रमाण कमी होते व साहजिकच शरीराची उष्णता कमी होऊन लघवीची जळजळ थांबते.

८) खूप ताप आला असेल, तर अशा वेळी दुधी भोपळ्याचे सूप पिणे एक उत्तम औषध ठरते. यामुळे ताप कमी होण्यास मदत होते. तसेच ताप चढत असल्यास दुधी किसून कपाळावर लेप लावावा. असे केल्याने ताप उतरण्यास मदत होते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# पुरुषोत्तम मासानिमित्त गजानन महाराज मंदिरात श्री विष्णू याग विधिवत; तेहतिस जोडप्यांना 'वाण'चे वितरण; भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ




हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम (अधिक) मासानिमित्त ब्राह्मण विचार मंचाच्या वतीने सावेडी येथील गुलमोहर रोडवरील नवलेनगर परिसरातील गजानन महाराज मंदिरात श्री विष्णू याग व पूजनाचा धार्मिक सोहळा भक्तिभावाने व उत्साहात झाला.

नगर – हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम (अधिक) मासानिमित्त ब्राह्मण विचार मंचाच्या वतीने सावेडी येथील गुलमोहर रोडवरील नवलेनगर परिसरातील गजानन महाराज मंदिरात श्री विष्णू याग व पूजनाचा धार्मिक सोहळा भक्तिभावाने व उत्साहात झाला. या प्रसंगी विविध धार्मिक विधी, महाआरती, वाण वितरण आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ब्राह्मण विचार मंचचे अध्यक्ष शिरीष जानवे, भाजपच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सौ. प्रिया जानवे, ब्राह्मण विचार मंचचे सचिव महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष बन्सी महाराज मिठाईचे राजकुमार जोशी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुरुषोत्तम मास हा हिंदू धर्मामध्ये विशेष महत्त्वाचा मानला जातो. या काळात विवाह, मुंज, साखरपुडा, वास्तुशांती यांसारखी शुभकार्ये टाळली जात असली तरी अन्नदान, धार्मिक पूजन, भगवान विष्णूची उपासना आणि दानधर्माला विशेष महत्त्व असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या विष्णू याग पूजनासाठी शिरीष जानवे, सौ. प्रिया जानवे, राजकुमार जोशी यांचे भाचे आशिष गोपीकृष्ण शर्मा व सौ. राखीताई शर्मा तसेच गजानन महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कुमार नवले व सौ. स्वाती नवले या दांपत्यांना यजमानपदाचा लाभ मिळाला. वेदमंत्रांच्या मंगल घोषात आणि धार्मिक वातावरणात संपन्न झालेल्या या यागानंतर महाआरती करण्यात आली. त्यानंतर पुरुषोत्तम मासानिमित्त ३३ जोडप्यांना पारंपरिक वाण देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या धार्मिक कार्यक्रमास अखिल भारतीय ब्राह्मण संघाचे अध्यक्ष प्रा. मधुसूदन मुळे, महापौर ज्योती गाडे, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, नगरसेविका गौरी बोरकर, भाजपच्या प्रदेश सरचिटणीस गीता गिल्डा, पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा व भाजप ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा स्वाती शिरसुल, जिल्हा सरचिटणीस ज्योती दांडगे, अशोकराव गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे, सावेडी विभाग भाजप अध्यक्षा रेणुका करंदीकर, विशाल साबळे, आदिनाथ मस्के, विशाल लेंभे, निमा लेंभे यांच्यासह सावेडी परिसरातील भक्तगण उपस्थित होते.

यावेळी ब्राह्मण विचार मंचचे अध्यक्ष शिरीष जानवे यांनी सांगितले की, पुरुषोत्तम मास हा भगवान विष्णूच्या आराधनेचा आणि आत्मशुद्धीचा महिना आहे. या महिन्यात केलेली उपासना, दानधर्म आणि धार्मिक कार्ये अनेक पटींनी पुण्यप्रद मानली जातात. समाजामध्ये धार्मिक संस्कार, एकोपा आणि अध्यात्मिक जागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाईल. त्यांच्या या भूमिकेला उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## 'हरी मुखे म्हणा।'

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




माणसाने स्वतःचे कौतुक करायचे ते किती ? आपल्या दुर्गुणांचीही करायची सद्गुणात गणती? त्याची स्वतःवरच प्रीती! आपल्या मूर्ख वागण्याची देखील करायची स्तुती? यापायी आपलंच नुकसान, याचीही ना क्षिती ? यामुळे का होईल कशी प्रगती ? या पायी होईल अधोगती! असलेल्या थोड्याफार गुणांचीही होईल माती!

'मी काय कमी आहे का? रिकामा का बसलोय ? कविता करतोय म्हटलं कविता! काय व कशी चालतात आमची डोकी म्हणून सांगू? वडील देतात कुठल्यातरी पुड्या! ते आहेतच तसे वैद्यराज! आई तरी कुठे रिकामी ? सदा गुंतलेली कामी. धूत बसते पाटा-वरवंटा आणि उखळ व दगडी भांडी ? गाई मागे गुराखी, तसे धनामागे आम्ही! आम्ही काय कुणाहून कमी ? सदाचार आणि सद्विचार अंगी बाणला की स्वतःच्याच कौतुकाचा विषय संपला.

'सज्जनांच्या रीतीप्रमाणे वागावे. मनाला आवरून विवेक करायला लावावे. नाही तर जे जे करू, ते ते सौख्यहरू ठरेल! मनाला खूप त्रासदायक असेल. प्रसंगानुरूप वागण्याची धूर्तता, संकटातून तारून नेते. सामान्य बुद्धीचा वागेल. त्यापेक्षा अधिक सामंजस्याने कसे वागता येईल याचा शोध घेणे, हे आगळेवेगळे सामर्थ्य अंगी बाणणे. ही नरलक्षणे. संत ज्ञानेश्वर म्हणतात, मुखाने आपले गुण नव्हे, तर त्या अनंताचे गुण गा. पांडुरंगाला आठवा.' एकदा एक तरुण स्त्री आपल्या नवऱ्याजवळ स्वतःचे कौतुक करीत होती. 'माझा गौरवर्ण पाहून चंद्र लाजला, असं सगळे म्हणतात. तुझ्या चालण्याचा डौल शिकवशील मला, असं म्हणे हंस विचारतो. माझ्या गालावरची लाली पाहून गुलाब म्हणे कोमेजतो. माझे निळे डोळे दिसताच मोर म्हणे आपले नेत्र मिटून घेतो! पण तुम्ही हे काहीच पाहू शकत नाही म्हणून माझा जीव कासावीस होता.'

तिचा आंधळा नवरा काही बोलला नाही. ती पत्नी मात्र बोलतच होती. 'माझ्या वडिलांनी आंधळा नवरा गळ्यात बांधला आणि माझ्या सौंदर्याचं मातेरं केलं.'

आता मात्र आंधळा नवरा म्हणाला, 'वडिलांनी नाही तुझ्या सौंदर्याचं मातेरं केलं. ब्रह्मदेवानंच जन्माला घालताना तुझ्या सौंदर्याचं मातेरं केलं होतं. त्या मातेऱ्याचं उलट तुझ्या बाबांनी आंधळ्याच्या गळ्यात बांधून सोनं केलं. तू कितीही कुरूप असलीस तरी मला ते भावतंच! तू आवडतेसच. हेच ओळखलं तुझ्या वडिलांनी. पुन्हा नको करूस कौतुक स्वतःच्या रूपाचं. मूर्ख का आहे मी? तू खूप सुंदर आहेस अशी कल्पना करायला निर्बुद्ध का आहे मी? कौतुक करायचं तर ते तुझ्या बाबांच्या व्यवहारी चातुर्याचं !'

**– किशोर गांधी**

# अहिल्यानगर विकासातर्फे शैक्षणिक व औद्योगिक अभ्यासदौऱ्यास प्रतिसाद

## विकासा अध्यक्ष सीए महेश तिवारी यांची माहिती




अहिल्यानगर विकासातर्फे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व औद्योगिक अभ्यासदौऱ्यास प्रतिसाद मिळाला.

नगर – अहिल्यानगर विकासातर्फे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व औद्योगिक अभ्यासदौऱ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या अभ्यासदौऱ्यास तब्बल ५० विद्यार्थ्यांनी नोंदणी करून प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना उद्योग, शिक्षण आणि सांस्कृतिक वारसा यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा या उद्देशाने संगमनेर येथील राजहंस डेअरी, अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच भंडारदरा परिसरातील विविध स्थळांना भेट देण्यात आल्याची माहिती विकासा अध्यक्ष सीए महेश तिवारी यांनी दिली.

प्रथम विद्यार्थ्यांनी राजहंस डेअरी, संगमनेर येथे भेट दिली. डेअरी व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना दूध संकलनापासून ते प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग आणि वितरणापर्यंतची संपूर्ण उत्पादन साखळी सविस्तरपणे समजावून सांगितली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्वच्छता मानके, उत्पादन व्यवस्थापन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत दुग्धव्यवसायाचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती मिळाली. उद्योग क्षेत्रातील कार्यपद्धती आणि व्यवस्थापन कौशल्यांची ओळख विद्यार्थ्यांना या भेटीद्वारे झाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथे शैक्षणिक भेट दिली. महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी संस्थेची शैक्षणिक वाटचाल, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, उद्योग-संलग्न उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी यांची माहिती दिली. यावेळी महाविद्यालय हे देशातील अग्रगण्य अभियांत्रिकी संस्थांपैकी एक असून भारतातील अव्वल महाविद्यालयांमध्ये गणले जाते, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. उच्च शिक्षणातील गुणवत्ता, संशोधन आणि नवोपक्रम यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना या भेटीतून समजले.

विशेष म्हणजे, राजहंस डेअरी व अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अतिशय आदरपूर्वक स्वागत केले. त्यांचा पाहुणचार, सहकार्याची भावना आणि माहिती देण्याची पद्धत अत्यंत प्रभावी होती.

सायंकाळी विद्यार्थ्यांनी भंडारदरा येथील काजवा महोत्सवाचा आनंद घेतला. निसर्गाच्या सान्निध्यात हजारो काजव्यांच्या प्रकाशाने उजळलेला परिसर विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. पर्यावरण संवर्धन, जैवविविधता आणि नैसर्गिक परिसंस्थांचे महत्त्व याविषयीही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली. यासोबतच विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या रतनगड पायथ्याशी स्थित प्राचीन अमृतेश्वर मंदिराला भेट दिली. हेमाडपंथी स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना असलेल्या या मंदिराच्या वास्तुकलेची आणि ऐतिहासिक वारशाची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवाची ओळख करून देणारा हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी विशेष ठरला.

या अभ्यासदौऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, उपाध्यक्ष व विकासा अध्यक्ष सीए महेश तिवारी, खजिनदार व विकासा कार्यकारिणी सदस्य सीए सुनंदा रच्चा, समिती सदस्य सीए काजल चंदे, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, विकासा उपाध्यक्षा मोक्षी बोरा, सचिव हर्षल फिरोदिया, खजिनदार सिद्धी गुगळे, संयुक्त सचिव जितेश खुराणा, संयुक्त खजिनदार ईशा कटारिया तसेच समिती सदस्य साक्षी साठे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि नियोजनामुळे हा शैक्षणिक व औद्योगिक अभ्यासदौरा यशस्वीरीत्या पार पडला.विद्यार्थ्यांना उद्योग, शिक्षण, निसर्ग आणि सांस्कृतिक वारसा यांचा समन्वित अनुभव देणारा हा उपक्रम अत्यंत ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरल्याची भावना सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# संतांचे कृपादान हे कधीच संपणार नाही

## हभप डॉ. विकास मिसाळ यांचे मत; बाळनाथ गडावर धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा उत्तराधिकारी समारंभ



अहिल्यानगर तालुक्यातील बाळनाथ गड येथे संत चरण रज छगन महाराज यांचा उत्तर अधिकारी म्हणून धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा सन्मान करण्यात आला. (छाया – विजय मते)

नगर – संतांचे चरणांचे दास झालो तर ते आपल्याला कोणत्याही प्रकारची आस शिल्लक ठेवणार नाही, आपण स्वतःला त्यांचे दास म्हणून घेतले पाहिजे. परमात्मा जगाचे हित करणारा आहे, तर जीवनाचे कल्याण करणारे संत असतात. संत कृपादान करतात ते असे दान देतात की ते कधीच संपणार नाही. तेव्हा प्रत्येकाने संतसंगती प्राप्त करण्यासाठी आपल्या जीवनाचे ध्येय ठेवावे, असे निरूपण हभप डॉ. विकास मिसाळ महाराज यांनी केले.

बाळनाथ गड येथे ९ जून रोजी दुपारी संत चरणरज छगन महाराज यांचा उत्तराधिकारी म्हणून धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा दीक्षा समारंभ झाला. यावेळी अहिल्यानगर सह महाराष्ट्रातील संत, महंत, वारकरी संप्रदाय, हभप मंडळी उपस्थित होते.

यावेळी आपल्या कीर्तनामधून मिसाळ महाराजांनी संत चरणरज छगन महाराज यांचा वारकरी संप्रदायातील प्रवास, बाळनाथ गडाची स्थापना ते उत्तराधिकारी नेमणुकीपर्यंत चा प्रवास किती खडतर होता, याचे विवेचन केले. त्यांचे प्रमाणे धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांनी देखील छगन महाराज यांच्याप्रमाणेच बाळनाथ गडाची गादी सांभाळावी. असे आवाहन त्यांनी केले.

या समारंभास आ. अक्षय कर्डिले, प्रतिभाताई पाचपुते, हभप रेखाताई रिंगणे, वारकरी संप्रदायाचे प्रदेश उपाध्यक्ष माऊली गायकवाड, सर्वश्री हभप महादेव वांढेकर, घनश्याम शिंदे, मच्छिंद्र उरंगे, कैलास कोहोक, आदिनाथ शास्त्री, प्रकाश देवगिरे, बाळकृष्ण सोनवणे, दीपक महाराज, चितळे महाराज, नारायण गिन्हे, राजेश्वरानंद कुन्हे,महादेव कोरे, बाबासाहेब जाधव, अनिकेत लाड, श्यामसुंदर नाणेकर आदि संत मंडळी उपस्थित होते. हभप डॉ.मिसाळ यांच्या कीर्तनानंतर धर्मनाथ आदिनाथ यांचा छगन महाराजांचा फेटा बांधून, ग्रंथ पूजा करून सन्मान करण्यात आला. त्यांच्या उत्तराधिकारी पदवी प्रदान समारंभात भाविकांनी, संत मंडळींनी त्यांच्या डोक्यावर पुष्पवृष्टी करून आशीर्वाद दिला.या कार्यक्रमानंतर बाळेवाडी मधील ग्रामस्थांसह परिसरातील गावांमधून ग्रामस्थांनी भाविकांना धोंडे जेवण दिले. सूत्रसंचालन महेश वाघ यांनी केले. प्रसाद देव महाराज यांनी आभार मानले.

# काढणीपश्चात पायाभूत सुविधा व पॅकेजिंग युनिटसाठी अर्ज करावेत

नगर – सन २०२६–२७ च्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान योजनेंतर्गत कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने काढणीपश्चात पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट्स या घटकासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी, प्राथमिक कृषी पतसंस्था तसेच इच्छुक वैयक्तिक लाभार्थ्यांनी २१ जून पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा २५ लाख रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी या घटकांतर्गत ३ युनिट्सचे भौतिक लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

ही योजना बँक कर्जाशी निगडित असल्याने केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहणार आहे. राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित अर्जदार, पतसंस्था, शेतकरी उत्पादक कंपनी अथवा संघ यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

शेतकरी उत्पादक संघ, प्राथमिक कृषी पतसंस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांनी मागील दोन वर्षांचे लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल, नोंदणी प्रमाणपत्र, ७/१२ व ८–अ उतारे सादर करणे आवश्यक आहे. वैयक्तिक अर्जदारांसाठी ७/१२ व ८–अ उतारे आवश्यक असून अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे.

एका कुटुंबातील पती, पत्नी व अविवाहित मुलांपैकी केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम तसेच कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी उभारण्याची आर्थिक क्षमता अर्जदाराकडे असणे आवश्यक असल्याचे श्री. बोराळे यांनी स्पष्ट केले आहे.



जागतिक दृष्टी दान दिवसानिमित्त नेत्रदान जनजागृती व लोकशिक्षण या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्या हस्ते झाला.

# मरणोत्तर नेत्रदानाच्या पवित्र कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन

नगर – आज जागतिक दृष्टी दान दिवस. या निमित्ताने नेत्रदानाविषयीचे गैरसमज दूर करून सर्वांना शास्त्रशुद्ध वैज्ञानिक माहिती मिळावी व सर्वांनी मोठ्या प्रमाणात मरणोत्तर नेत्रदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

डॉ. आशिया यांनी सदर प्रसंगी स्वतः नेत्रदानाचा फॉर्म भरून स्वाक्षरी केली व एक आदर्श समाजापुढे ठेवला. अशी माहिती मानकन्हैया नेत्रपेढीच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली. अ.नगर क्लब येथे जागतिक दृष्टी दान दिवसानिमित्त नेत्रदान जनजागृती व लोकशिक्षण या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्या हस्ते झाला. सदर कार्यक्रमाचे आयोजन मानकन्हैया नेत्रपिढीच्या वतीने करण्यात आले. अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया होते.

नेत्रदान हे एक पवित्र दान असून केल्याने दुप्पट होणारे दान आहे. एका व्यक्तीने केलेले नेत्रदान, दोन अंध बांधवांना दृष्टी देऊन जाते. आज विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी कृत्रिम कॉर्निया अजून तयार होऊ शकत नाही. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदान करणे महत्त्वाचे आहे. मी स्वतः माझ्या वडिलांचे मृत्यूनंतर नेत्रदान करून नेत्ररोपणाचे ऑपरेशन केले असे प्रतिपादन डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले.

सुरुवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले व नेत्रदान कोण करू शकतो? ते कसे करावे? नेत्रपेढी म्हणजे काय? या सर्व बाबी स्पष्ट करून सांगितल्या. मानकन्हैया नेत्रपेढीला महाराष्ट्र आरोग्य मंत्रालयाच्या वतीने सर्वोत्कृष्ट आय बँक हा पुरस्कार प्राप्त झाल्याचेही त्यांनी नम्रपणे विधीत केले. सदर प्रसंगी किशोर मुनोत, प्रेमचंद बोथरा, रवी बक्षी, डॉ. कल्याण भोसले, अशोक बालदोटा आदी उपस्थित होते. अ. नगर क्लब मध्ये उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तींना नेत्रदानाच्या फॉर्मचे वितरण करण्यात आले.

शेवटी व्यवस्थापक रामदास केदार यांनी आभार मानले.

# डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशनची सर्वसाधारण सभा उत्साहात

## अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, बालकल्याण उपक्रमांचे कौतुक



डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात झाली.

नगर – डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला-मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह संस्थेची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झारेकर गल्ली येथील संस्थेच्या कार्यालयात जिल्हाधिकारी तथा संस्थेचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाली. संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी आणि आगामी वर्षातील विविध योजनांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सभेला संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारी सदस्य तसेच कर्मचारी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. त्यानंतर संस्थेचा वार्षिक अहवाल, आर्थिक वर्षातील हिशोब पत्रके, अंदाजपत्रक, हिशोब तपासणीसाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती, रिक्त पदांच्या भरतीसंदर्भातील प्रस्ताव तसेच संस्थेच्या प्रशासकीय आणि विकासात्मक कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. संस्थेच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी तसेच मुला-मुलींना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विविध सूचना आणि प्रस्तावांवर एकमताने निर्णय घेण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपाध्यक्ष अच्युतराव चौधरी, सचिव ॲड. गोविंदराव मिरीकर, ॲड. जयवंत भापकर, डॉ. शकील फातेमा शेख, खजिनदार ॲड. विश्वासराव आठरे पाटील, कार्यकारी सदस्य मीरा कुलकर्णी, अनुराधा आठरे, विनिता गुणे, कंचन रच्चा, प्राची देशमुख, डॉ. अमित बडवे, संस्थेच्या अधीक्षिका पौर्णिमा माने, सीए रोहित बोरा, जिमबा अधिकारी संजय कदम, संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

सभेदरम्यान जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. उपस्थितांनीही पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संस्थेतील मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य, संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक सहभाग यांना विशेष महत्त्व देण्याची गरज अधोरेखित केली. संस्थेतील मुला-मुलींना सुरक्षित, सुसंस्कृत आणि प्रगतीशील वातावरण मिळावे यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. तसेच संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी मुला-मुलींसाठी सेवा, सुविधा, शिक्षण, आरोग्यविषयक उपक्रम आणि विविध सामाजिक कार्यक्रम प्रभावीपणे राबविल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सभेचा समारोप खेळीमेळीच्या आणि सकारात्मक वातावरणात झाला.

# विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शिक्षणाला खूप महत्त्व

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; श्री सांदिपनी अॅडमीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व डॉ.के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' पुस्तकाचे प्रकाशन

नगर – आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले असून ज्ञान, कौशल्य आणि स्पर्धात्मकता यांना आजच्या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली असून त्याच्या बळावर विद्यार्थी देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. श्री सांदीपनी अॅकॅडमीच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरात गुणवंत, कर्तृत्ववान आणि स्पर्धात्मक विद्यार्थी घडविण्याचे उल्लेखनीय कार्य सुरू आहे. डॉ. के. बालराजु कर्री यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, योग्य दिशा आणि आधुनिक अभ्यासपद्धतीची माहिती मिळत आहे. त्यामुळे स्पर्धेच्या या युगामध्ये आपल्या शहरातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतील. उद्याच्या उज्ज्वल भारताच्या निर्मितीत हे विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतील. विशेष म्हणजे अॅकॅडमीच्या माध्यमातून गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' हे पुस्तक देशातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि करिअर घडणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.







श्री सांदीपनी अॅकॅडमीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' पुस्तकाच्या प्रकाशनाचा सोहळा उत्साहात झाला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, संस्थापक अध्यक्ष डॉ. बालराजु कर्री, प्राध्यापक नानासाहेब बारहाते, राहुल गुजराल, संचालिका मोनिका बालराजु कर्री आदी उपस्थित होते.

श्री सांदीपनी अॅकॅडमीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' पुस्तकाच्या प्रकाशनाचा सोहळा उत्साहात झाला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, संस्थापक अध्यक्ष डॉ. बालराजु कर्री, प्राध्यापक नानासाहेब बारहाते, राहुल गुजराल, संचालिका मोनिका बालराजु कर्री आदी उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये विविध स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश परीक्षा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामागील त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे कौतुक करण्यात आले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. बालराजु कर्री म्हणाले की, श्री सांदीपनी अॅकॅडमीची स्थापना ग्रामीण भाग आणि छोट्या शहरातील विद्यार्थ्यांनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराचे दर्जेदार शिक्षण व मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने करण्यात आली. महाराष्ट्र आणि भारतातील सर्वोत्तम अभियांत्रिकी आणि वैद्यकीय संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणे हा अक्ॅडमी स्थापनेमागील प्रमुख हेतू होता. या उद्देशाने २०१५ साली सावेडी, अहिल्यानगर येथे श्री सांदीपनी अॅकॅडमीची सुरुवात करण्यात आली. ते पुढे म्हणाले की, ५ ते १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेले तज्ज्ञ शिक्षक, अनेक वर्षांच्या अथक परिश्रमातून तयार करण्यात आलेले उत्कृष्ट स्टडी मटेरियल, आधुनिक टेस्ट सिरीज, वैज्ञानिक अभ्यास आणि उजळणी प्रणाली यांचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. या सर्व प्रयत्नांच्या बळावर नगर शहरातील सर्वोत्तम निकालांची परंपरा जोपासण्यात अॅकॅडमीला अभूतपूर्व यश मिळाले आहे. नगर शहरातील सर्वाधिक IITians, NITians आणि Doctors घडविणे ही आमची उपलब्धी असली तरी तीच आमची अंतिम यशाची व्याख्या नाही. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, चांगल्या सवयी, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे हे देखील आमचे महत्त्वाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांना वाईट सवयींपासून दूर ठेवून त्यांच्या तार्किक, वैज्ञानिक, अध्यात्मिक आणि सामाजिक विकासासाठी सर्वोत्तम वातावरण उपलब्ध करून देण्याचे कार्य अक्ॅडमी सातत्याने करत आहे. याचमुळे आज अनेक विद्यार्थी देशातील नामांकित संस्थांमध्ये शिक्षण घेत असून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आलेले 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' हे पुस्तक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले. विषयाची सखोल आणि सोपी मांडणी, आधुनिक अभ्यासक्रमाशी सुसंगत माहिती आणि विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन पुस्तकाची रचना करण्यात आल्याने ते विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

# 'अमृत' संस्थेमार्फत पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन

नगर – महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या 'अमृत पर्यटन' उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक तसेच नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून पर्यटन क्षेत्रातील इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यटन क्षेत्राला चालना देणे, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती वाढविणे तसेच पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना सक्षम करणे या उद्देशाने 'अमृत पर्यटन' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील पर्यटन स्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने आणि पर्यटन व्यवसायांना नवीन संधी उपलब्ध करून देण्याचे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

पर्यटन क्षेत्र हे देशातील वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असून या क्षेत्रात व्यवसाय विस्तार, स्वयंरोजगार व आर्थिक प्रगतीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा लाभ अधिकाधिक उद्योजकांना मिळावा तसेच त्यांना आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात टूर्स अँड ट्रॅव्हल्स, व्यावसायिक, टुरिस्ट गाईड, कुक अँड कॅटरर्स, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, पर्यटन सेवा पुरवठादार, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक–युवती सहभागी होऊ शकतात.

कार्यक्रमादरम्यान सहभागी उद्योजकांना व्यवसाय उभारणी व विस्तारासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रभावी व्यवसाय नियोजन, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधी तसेच शासनाच्या विविध योजना व साहाय्याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. तसेच अनुभवी तज्ज्ञ आणि क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांकडून प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अमृत पर्यटन उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्रात स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी व प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला असून पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योजक, व्यावसायिक आणि इच्छुक युवक–युवतींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, वरुण अपार्टमेंट, फ्लॅट क्रमांक ०२, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष अथवा ९११२२२८७६९ किंवा ९७६६६२२२७४ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात

## महिलांसाठी मोफत ओपीडी व गर्भवती मातांची मोफत तपासणी, गावात शुगर व ईसीजी तपासणीची सुविधा उपलब्ध होणार

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा प्रतिसाद लाभला.


निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात झाले.

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन आणि सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच सौ. प्रियंका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुलभा पवार यांनी मासिक पाळी स्वच्छता, महिलांचे आरोग्य, रक्तक्षय (ॲनिमिया), स्त्रीरोगविषयक समस्या तसेच महिलांमध्ये आढळणाऱ्या विविध आरोग्यविषयक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच हिमोग्लोबिन तपासणी करून आवश्यक आरोग्य सल्ला देण्यात आला.

यावेळी आरोग्यविषयक समस्या असलेल्या महिलांना मोफत ओपीडी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी गर्भवती मातांची मोफत तपासणी, सर्व रुग्णांची मोफत शुगर तपासणी आणि मोफत ईसीजी तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके (बोबडे), हर्षल आगळे, डॉ. अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थितांनी महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# जनगणनेत अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात द्वितीय

## अवघ्या २१ दिवसांत शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण; आयुक्तांनी मानले नागरिकांचे आभार

नगर – भारत सरकारच्या गृह मंत्रालयामार्फत राबविण्यात आलेल्या जनगणना मोहिमेत अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ३० दिवसांसाठी नियोजित असलेले जनगणनेचे उद्दिष्ट केवळ २१ दिवसांत पूर्ण करून महानगरपालिकेने कार्यक्षमता, प्रभावी नियोजन आणि संघभावनेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

या यशामागे प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, जनगणना कक्ष प्रमुख राकेश कोतकर, सर्व प्रभाग अधिकारी, ब्रँड ॲम्बेसेडर डॉ. अमोल बागुल, मास्टर ट्रेनर्स, प्रगणक, पर्यवेक्षक तसेच तांत्रिक पथक यांचे समन्वयपूर्ण नेतृत्व आणि अथक परिश्रम मोलाचे ठरले.

या यशाबाबत आयुक्त श्री. डांगे म्हणाले, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे या मोहिमेच्या यशाचे प्रमुख कारण ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने स्वतः साठी वेळेची उद्दिष्टे निश्चित करून शिस्तबद्ध पद्धतीने काम केले. त्यामुळे जनगणना मोहिमेला अपेक्षेपेक्षा अधिक गती मिळाली. मोहिमेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने सोडविण्यात आल्या. तसेच दर चार दिवसांनी आढावा बैठका घेऊन पुढील टप्प्यांचे नियोजन आणि आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण मोहिमेत सातत्य, वेग आणि अचूकता कायम राखणे शक्य झाले.

अतिरिक्त आयुक्त श्री. मुतकेकर यांनी सांगितले की, जनजागृती आणि संवादावर विशेष भर देण्यात आला. त्यासाठी विविध नावीन्यपूर्ण माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रेरणादायी गीते, माहितीपर चित्रफिती, दैनंदिन ग्राफिक संदेश, आकाशवाणीवरील मुलाखती, जिंगल्स तसेच विविध समाजमाध्यमांद्वारे नागरिक, प्रगणक आणि पर्यवेक्षक यांचे सातत्याने प्रबोधन करण्यात आले. त्यामुळे मोहिमेला व्यापक लोकसहभाग लाभला.

अचूक माहिती संकलन, वेळेचे काटेकोर नियोजन, प्रभावी जनजागृती आणि संघभावनेच्या बळावर अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात मानाचे स्थान मिळविले आहे. ही कामगिरी भविष्यातील प्रशासकीय उपक्रमांसाठी प्रेरणादायी ठरणारी असून जनगणना कार्यात योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, प्रगणक, पर्यवेक्षक आणि सहायक पथकाचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# 'सन १९५० पूर्वीची हस्तलिखिते' 'ज्ञानभारतम ॲप'वर अपलोड करा

नगर – जिल्ह्यातील सर्व नागरिक तसेच ग्रंथालयांनी ज्ञानभारतम ॲपवर सन १९५० पूर्वीची हस्तलिखिते, पोथ्या, पुराणे तसेच योग, आरोग्य, अंकगणित, विज्ञान, खगोलशास्त्र आदी विषयांवरील साहित्याची नोंद १५ जून पर्यंत अपलोड करण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत सध्या हस्तलिखितांची संख्या, भाषा, लिपी तसेच साहित्याची स्थिती याबाबतची प्राथमिक माहिती नोंदवावयाची असून संबंधित साहित्याच्या आतील पृष्ठांची दोन ते तीन छायाचित्रेही अपलोड करावयाची आहेत. माहिती भरताना गुगल लोकेशन सेवा सुरू ठेवणे आवश्यक असून त्यामुळे संबंधित साहित्य नेमके कुठे उपलब्ध आहे, याची नोंद करणे सुलभ होईल.

ज्ञानभारतम ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून त्याद्वारे माहिती सहजपणे अपलोड करता येईल. संबंधित हस्तलिखितांवरील मालकी हक्क मूळ धारकांकडेच कायम राहणार असून केंद्र शासनाकडून केवळ त्या साहित्याचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. या प्रक्रियेचा संपूर्ण खर्च केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या वैयक्तिक संग्रहातील तसेच ग्रंथालयांमधील साहित्याबरोबरच परिसरातील खासगी व्यक्ती, मंदिरे, मशिदी, महानुभाव आश्रम आदी ठिकाणी उपलब्ध हस्तलिखिते आणि प्राचीन साहित्य यांची ज्ञानभारतम ॲपवर नोंद करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.



रेसिडेन्शिअल महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दीपक जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

# 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६'ने प्रा. डॉ. दीपक जाधव यांचा गौरव

नगर – बी दि चेंज फाउंडेशनच्या वतीने अहिल्यानगर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे रेसिडेन्शिअल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दिपक नाना जाधव यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील गुणवंत, कर्तव्यनिष्ठ व समाजाभिमुख शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला. यामध्ये प्रा. डॉ. जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी सुभेदार मेजर दिनकर पवार, माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे, अभिनेत्री निवेदिता पगार, बाबासाहेब कापे, प्रकाश कोळपे तसेच अमृत रोहोम आदी उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे, सचिव रचना ढोकचौळे व विश्वस्त अभिषेक तुपे यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

प्रा. डॉ. जाधव यांनी भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र या चार विषयात पदवीत्तर पदवी संपादन केली आहे. तसेच ते राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), व राज्य पात्रता परीक्षा (सेट) या दोन्ही परीक्षा यापूर्वीच उत्तीर्ण असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाने भूगोल विषयात त्यांना पी. एचडी ही पदवी प्रदान केली आहे.

डॉ. जाधव हे देहरे ता. जि. अहिल्यानगर येथील ग्रामपंचायतचे दोन वेळा सदस्य व एकदा उपसरपंच राहिले आहेत. त्यांनी ग्रामपंचायतीच्या काळात अनेक वेळा उपोषण तसेच रस्ता रोकोसारख्या अंदोलनातून गावाचे व समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावलेले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठ विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे, उपाध्यक्ष सिताराम खिलारी, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य दिपक दरे, प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील यांनी अभिनंदन केले.

# विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हीच काळाची खरी गरज

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; अवधूत फुलसौंदर व वैष्णव मित्र मंडळाचा वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम

नगर – वैष्णव मित्र मंडळ, नक्षत्र प्राणायाम ग्रुप, प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिक तसेच ॲड. अवधूत भगवानराव फुलसौंदर यांच्या वतीने बालाजी कॉलनी, नक्षत्र लॉनजवळील फुलसौंदर मळा, बुरुडगाव रोड येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रम राबवत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.


अवधूत फुलसौंदर व वैष्णव मित्र मंडळ, नक्षत्र प्राणायाम ग्रुप, प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिक यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, आज आपण ज्या वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहोत, रस्ते, पूल, इमारती आणि विविध विकासकामे आवश्यक असली तरी त्याचवेळी पर्यावरणाचा समतोल राखणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढ्यांसाठी शुद्ध हवा, सावली आणि जीवनाचा आधार बनते. त्यामुळे प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. समाजातील प्रत्येक आनंदाचा क्षण वृक्षारोपणासारख्या विधायक कार्याशी जोडला गेला तर पर्यावरण संरक्षणाची मोठी लोकचळवळ उभी राहू शकते.

पुढे बोलताना आमदार जगताप म्हणाले, अहिल्यानगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. शहरात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात मोठी कामे सुरू आहेत. मात्र विकासाचा हा प्रवास पर्यावरणपूरक असलाच पाहिजे. पुढील काही वर्षांत शहरातील हरित क्षेत्र वाढवण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येतील. नागरिकांच्या सहकार्याशिवाय कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण वृक्ष संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी. आज लावलेले हे वृक्ष भविष्यात हजारो लोकांना जीवनदायी ठरणार आहेत. हीच माझ्यासाठी वाढदिवसाची सर्वात मोठी भेट आहे.

कार्यक्रमात नगरसेविका सुनीता फुलसौंदर यांनी सांगितले की, वृक्षारोपण हा केवळ फोटो काढण्याचा किंवा एक दिवसाचा कार्यक्रम नसून ती एक सामाजिक चळवळ आहे. आपण झाडे लावतो, पण त्यांचे संगोपन करण्यात अनेकदा दुर्लक्ष होते. त्यामुळे प्रत्येकाने लावलेल्या झाडाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. हा उपक्रम केवळ पर्यावरण संवर्धनापुरता मर्यादित नसून समाजामध्ये सकारात्मक विचार रुजविणारा आहे. भविष्यातही अशाच उपक्रमांमधून नागरिकांना जोडण्याचे काम आम्ही सातत्याने करत राहू.

यावेळी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, गोरख पडोळे, कॅप्टन भोळकर यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी आपला सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आयोजक अवधूत फुलसौंदर यांनी प्रास्ताविक करताना आमदार संग्राम जगताप यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाचा गौरव केला. ते म्हणाले, आमदार संग्राम जगताप यांनी गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी सातत्याने काम केले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि विविध मूलभूत सुविधांच्या उभारणीत त्यांनी मोठे योगदान दिले आहे. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून आज लावलेले प्रत्येक झाड भविष्यातील पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरणार आहे. नागरिकांनी केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली तरच या उपक्रमाचे खरे यश मानता येईल.

कार्यक्रमास केदार, अभय लुंकड, सुनील चोरबेले, संजय गुंदेचा, पारस कासवा, अभय चोपडा, राजेंद्र मुथा, सोपानराव जाधव, गाडीकर, फिरोदिया, प्रकाश खाडे, तिवारी, शिवाजी शेळके, प्रवीण खैरे, रणसिंग, भोळकर, भास्करराव गायकवाड, जगन्नाथ बोरुडे, बबन फसले, कोल्हे, हारदे, दत्तात्रय साबळे, तुकाराम बोरुडे, डॉ. अभय मुथा, भाऊसाहेब फुलसौंदर, अनिल कदम, दिनेश शिंदे, ब्रह्मानंद पारीक, मुळे, बाळूगांधी, सचिन आरडे, सागर चंगेडिया, गणेश फुलसौंदर, गोरख अवसरकर, अविनाश फुलसौंदर, दिलीप गलांडे, विकास गिरी, आदिनाथ आंबेकर, निखिल फुलसौंदर, संजय हजारे, जगताप, सुरेखा बोरुडे आणि लुंकड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यावरण दूत सतीश गुगळे यांनी केले.

# कॅलिडोस्कोप



## खिडकीच्या छिद्रामुळे विमानप्रवास सुरक्षित!

विमानाची खिडकी इतर कोणत्याही वाहनाच्या खिडकीसारखी नसते, तर त्यात हवेचा दाब सांभाळून विमानातल्या प्रवाशांना उच्च दाबापासून वाचवण्याचं तंत्रज्ञान असतं. ही खिडकी प्रत्यक्षात ॲक्रिलिकच्या तीन थरांनी बनलेली असते. बाहेरील थर बाहेरील हवेला तोंड देतो आणि दाब हाताळतो. मधल्या थरात एक लहान छिद्र असते. तुम्ही तुमच्या सीटवरून सर्वात आतल्या थराला स्पर्श करू शकता. मधला थर संपूर्ण प्रणाली सुरक्षित ठेवतो.

विमान उंच जातं, तसतसा वाऱ्याचा जोर अधिक वाढतो. या वाऱ्यामुळे खिडक्यांवर जास्त दाब पडतो. या दरम्यान, काचेतील हे लहानसं छिद्र मदत करतं आणि ते केबिन आणि खिडकीच्या थरातील जागेतील दाबांचं संतुलन राखतं. अशा परिस्थितीत बाहेरील काच दाब सहन करते आणि आतील काच सुरक्षित राहते. शिवाय, विमान थंड हवेत उडतं, तेव्हा हवा वाफेसारखी बनते. अशा वेळी हे छिद्र ओलावा जमा होण्यापासून रोखतं आणि आवश्यक हवा आत आणण्यास मदत करतं. त्यामुळे खिडकी स्वच्छ राहते आणि तुम्ही ३५ हजार फूट उंचीवरूनही बाहेरचं दृश्य स्पष्ट पाहू शकता.

हे लहान छिद्र उड्डाण सुरक्षित आणि सुरळीत ठेवण्यात खूप मदत करतं. बहुतेक प्रवाशांच्वम ते लक्षातही येत नाही; परंतु ही एक स्मार्ट रचना आहे. ती प्रत्येक फ्लाइटमध्ये शांतपणे आपलं काम करत असते. या छोट्या छिद्राला 'ब्लीड होल' असं म्हणतात. ते खिडकीच्या थरांमधील दाब आणि ओलावा कमी करण्यात मदत करतं.

## ...यांना चावतात डास



अनेकदा आपल्याला असे वाटते, की डास कोणालाही चावतात; परंतु विज्ञानानुसार डास कोणाला चावायचे ते निवडताना खूप चोखंदळ असतात. डास कोणाकडे आकर्षित होतात हे ठरवण्यासाठी प्रामुख्याने मानवी शरीरातून बाहेर पडणारा कार्बन डायऑक्साइड वापरतात. सेन्सर्सच्या मदतीने ३० ते ५० फ ूट अंतरावरूनच या वायूचा वास घेऊ शकतात. त्यामुळे ज्या व्यक्तींचे श्वसन वेगवान असते किंवा ज्यांच्या शरीरातून जास्त कार्बन डायऑक्साइड बाहेर पडतो. त्यांच्याकडे डास अधिक वेगाने खेचले जातात.

केवळ श्वासच नाही, तर आपल्या शरीराचा गंध आणि घामदेखील यात महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवी घामामध्ये लॅक्टिक ॲसिड, युरिक ॲसिड आणि अमोनिया यांसारखे घटक असतात. या घटकांचा वास डासांना खूप प्रिय असतो. त्याचप्रमाणे आपल्या त्वचेवर कोट्यवधी नैसर्गिक बॅक्टेरिया असतात. त्वचेवर विशिष्ट प्रकारचे बॅक्टेरिया जास्त असणाऱ्यांना डास जास्त चावतात. विशेष म्हणजे, रक्तगटाचाही यात संबंध असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. 'ओ' ब्लड ग्रुप असलेल्या लोकांकडे डास, 'ए' किंवा 'बी' ग्रुप असलेल्या लोकांच्या तुलनेत दुप्पट जास्त आकर्षित होतात. याव्यतिरिक्त, आपण कोणत्या रंगाचे कपडे घालतो, याचाही डासांच्या निवडीवर परिणाम होतो. डास प्रामुख्याने रंगांच्या सहाय्याने आपली शिकार शोधतात आणि त्यांना काळा, निळा आणि लाल असे गडद रंग अधिक स्पष्टपणे दिसतात. गरोदर महिलांनाही डास चावण्याचे प्रमाण अधिक असते कारण त्यांच्या शरीराचे तापमान जास्त असते आणि त्या अधिक प्रमाणात कार्बन डायऑक्साइड बाहेर सोडतात. काही अभ्यासांनुसार मद्यपान (विशेषतः बिअर) केलेल्या व्यक्तींकडेही डास लवकर आकर्षित होतात. थोडक्यात सांगायचे तर, आपल्या शरीराची उष्णता, कार्बन डायऑक्साइड आणि शरीराचा विशिष्ट गंध यांमुळे डास काही ठराविक लोकांनाच जास्त लक्ष्य करतात.

## पक्ष्यांची गायन स्पर्धा




विविध ठिकाणी संगीत स्पर्धा, संगीत महोत्सवांचं आयोजन केलं जातं. या महोत्सवांमध्ये ठिकठिकाणचे गायक आपली गायकी सादर करतात. अशीच एक संगीत स्पर्धा थायलंडमधल्या नारथीवाटमध्ये होते. इथेही मोठ्या संख्येने गायक येतात. पण हे गायक साधेसुधे नसतात. या संगीत स्पर्धेत पक्षी सहभागी होतात. म्हणजेच ही पक्ष्यांची संगीत स्पर्धा आहे. थायलंडसह सिंगापूर आणि मलेशियातले पक्षीही या स्पर्धेत सहभागी होतात. १८०० पेक्षा जास्त पक्षी या स्पर्धेत सहभागी होतात. यासाठी पक्ष्यांना चार महिन्यांचं प्रशिक्षण दिलं जातं. बुलबुल, पोपट, कबुतर आणि इतर छोटे पक्षीही या स्पर्धेत सहभागी होतात. या स्पर्धेच्या चार फेऱ्या असतात. प्रत्येक फेरीत पक्ष्यांना तीन वेळा २५ सेकंद गायचं असतं. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पक्ष्यांना पंधरा फूट उंची खांबावरच्या एका पिंजऱ्यात ठेवलं जातं. हे पिंजरे खाली घेऊन त्यांना गायला सांगितलं जातं. गाण्यानुसार पक्ष्यांना गुण दिले जातात. सर्वात जास्त गुण मिळालेला पक्षी विजेता ठरतो. त्याला म्हणजे त्याच्या मालकाला भारतीय चलनात दीड लाख रुपयांचं बक्षिस दिलं जातं. पक्ष्यांची ही गायन स्पर्धा थायलंडमधलं एक आकर्षण आहे.

## आपण झोपेत खरेच मरतो का?

झोपेत मृत्यू येणे ही संकल्पना जितकी गूढ आहे, तितकीच ती मानवी मनाला चक्रावून टाकणारी आहे. आपण झोपेत खरेच मरतो का, हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. काही लोकांसाठी हे फक्त एक वाईट स्वप्न असू शकते, तर काहींसाठी हे एक धक्कादायक वास्तव ठरते. एखादी व्यक्ती झोपेत मरण्याचे स्वप्न पाहते, तेव्हा ती प्रचंड घाबरून अस्वस्थ होते. अचानक जाग आल्यावर तिच्या हृदयाचे ठोके वेगाने वाढतात आणि शरीराला घाम फुटतो. हे केवळ मनाचे खेळ असले, तरी प्रत्यक्षात झोपेत शांतपणे जग सोडणे यामागे शरीरातील गंभीर वैद्यकीय कारणे दडलेली असतात.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, एखादी व्यक्ती झोपेतच मरण पावली, तर याचा अर्थ ती व्यक्ती आतून गंभीर आजारी होती किंवा तिचे वय झाले होते. निरोगी माणूस अचानक झोपेत कधीच मरत नाही. झोपेच्या अवस्थेत शरीरातील अंतर्गत यंत्रणा संथ गतीने काम करत असते. अशा वेळी अचानक आलेला हृदयविकाराचा तीव्र झटका किंवा मेंदूत रक्ताची गाठ झाल्यामुळे आलेला स्ट्रोक (ब्रेन स्ट्रोक) हे झोपेत होणाऱ्या मृत्यूचे मुख्य कारण ठरतात. वयोवृद्ध लोकांमध्ये अवयव निकामी झाल्यामुळेही अनेकदा रात्रीच्या वेळी शांतपणे प्राणज्योत मालवते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर, माणसाचा मृत्यू झाल्यानंतरही त्याचे संपूर्ण शरीर एकाच क्षणी मृत होत नाही. जैविक मृत्यूच्या प्रक्रियेत मानवी शरीराचे काही अवयव मृत्यूनंतरही काही काळ त्यांचे कार्य सुरू ठेवतात. संशोधनानुसार शरीरातील श्वास थांबल्यानंतरही मानवी मेंदू पुढील सहा मिनिटांपर्यंत जिवंत आणि सक्रिय राहू शकतो. इतकेच नाही, तर मानवी हृदय



शरीरापासून वेगळे झाल्यानंतरही किंवा मृत्यूच्या पश्चात तब्बल ४ ते ६ तासांपर्यंत जिवंत राहण्याची क्षमता बाळगून असते. अवयवांच्या याच जिवंत राहण्याच्या गुणधर्मामुळे आधुनिक वैद्यकशास्त्रात अवयवदान ही संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. मृत्यू झाल्यानंतरही डोळे, किडनी, लिव्हर आणि हृदय यांसारखे अवयव विशिष्ट वेळेत काढून दुसऱ्या गरजू रुग्णाच्या शरीरात प्रत्यारोपित केले जाऊ शकतात. त्यामुळे झोपेत होणारा मृत्यू हा एका आयुष्याचा शेवट असला तरी अवयवदानाच्या माध्यमातून तो दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला नवीन जीवन देणारा एक आशेचा किरण देखील ठरू शकतो.

## नवरदेवाला सोडून प्रियकराच्या गळ्यात वरमाला


वरमाला घालतानाच प्रियकर दिसल्यावर वधू मंचावरून पळून गेली. तिने नवरदेवाला सोडून त्याच्या गळ्यात हार घातला. ही घटना मध्य प्रदेशातील छिंदवाडामधील उमरेठमध्ये घडली. नवरदेवाच्या कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. वधू मंचावरून पळून जात असल्याचा एक व्हिडीओदेखील समोर आला आहे. भलवी कुटुंबातील नवरदेव, परासियाहून मुजावर गावी आला होता. वरातीचे स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी झाली आणि त्यानंतर पाहुणे खाण्याच्या स्टॉल्सकडे गेले.

नवरदेव मंचावर आला. वरमाला सोहळ्याची तयारी सुरू झाली. थोड्याच वेळात, वधूदेखील मंचावर आली. तिने हातात वरमाला घेऊन आजूबाजूला पाहिले आणि मग मंचावरून पळून गेली. ती मंडपात असलेल्या तिच्या प्रियकरापर्यंत पोहोचली आणि त्याच्या गळ्यात हार घालून त्याला मिठी मारली. यामुळे उपस्थित असलेल्या सर्वांना धक्का बसला. वधूच्या कुटुंबियांनी प्रियकराला पकडून मारहाण केली. त्याला मंडपातून हाकलून देण्यात आले. त्यानंतर वऱ्हाडी आणि वधूच्या कुटुंबियांमध्ये वाद निर्माण झाला. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये तुंबळ हाणामारी झाली.



## ते करतात फर्निचरची शेती

लाकडी फर्निचर बनवण्यासाठी झाडं तोडली जातात. ५० वर्षं जुन्या झाडांपासून फर्निचर बनवण्याऐवजी झाडालाच फर्निचरचा आकार दिला तर... हे जास्त सोपं आणि पर्यावरणपूरक असेल हा विचार इंग्लंडमधल्या गेविन आणि ॲलिस मुन्रो यांच्या मनात आला आणि त्यांनी चक्क फर्निचरची शेती करायला सुरूवात केली. फर्निचरची शेती हे ऐकायला थोडं विचित्र वाटतं. पण हे प्रत्यक्षात घडतंय. आजवर या जोडप्याने ५० सोफे, १०० लॅम्प शेड आणि २५० खुर्च्यांची लागवड केली आहे. हे कसं घडू शकतं, हा प्रश्न तुम्हाला पडला असेल. फर्निचरची शेती करायची म्हणजे रोपट्यांनाच फर्निचरचा आकार द्यायचा. रोपट्यांची लागवड केल्यानंतर त्यांना फर्निचरच्या आकारात वाकवलं जातं. गेविनने २००६ मध्ये ही संकल्पना राबवली. त्याने सुरूवातीला अशा पद्धतीने खुर्च्या लावल्या आणि मग ही शेती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. २०१२ मध्ये गेविनने ॲलिसशी लग्न केलं. तिलाही गेविनची कल्पना खूपच आवडली. मग त्यांनी कंपनी सुरू केली. गेविनने बोन्सायचं रोपटं बघितलं होतं. या रोपट्याचा आकार खुर्चीसारखाच होता. हे रोपटं बघून गेविनला ही कल्पना सुचली. रोपट्यांना फर्निचरचा आकार देणं खूप कठीण असतं. यासाठी रोपट्यांच्या फांद्यांना फर्निचरप्रमाणे वाकवावं लागतं. गेविन आणि त्यांची पत्नी ॲलिस आता या कामात तरबेज झाले आहेत.अशा पद्धतीने खुर्ची बनवण्यासाठी जवळपास आठ ते नऊ महिन्यांचा काळ लागतो. मग ही खुर्ची वाळवावी लागते. त्यासाठीही तेवढाच काळ लागतो. त्यामुळे हे काम वेळखाऊ आणि मेहनतीचं आहे.



## नोकरीसाठी पदव्या आणि गुण निकामी?

जगातील अनेक लोक नोकरी मिळविण्याच्या शर्यतीत व्यस्त आहेत; पण बरेचदा नोकरीसाठी पदवी आणि अभ्यासातील गुणांचा उपयोग होत नाही.

सध्या 'सोशल मीडिया'वर एक पोस्ट व्हायरल होत आहे. त्यात दिल्ली विद्यापीठातील एक विद्यार्थिनी आपली व्यथा मांडताना दिसते. 'अनेक पदके आणि प्रमाणपत्रे असूनही मला इंटर्नशिप मिळत नाही', असं बिस्मा नावाची दिल्ली विद्यापीठाची ही विद्यार्थिनी सांगते. तिच्या 'लिंक्डइन पोस्ट'ने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. ती पुढे म्हणते माझ्याकडे अनेक ट्रॉफीज आहेत. आपण त्या खूप कष्टाने जिंकल्या आहेत. याशिवाय माझ्याकडे ५० हून अधिक प्रमाणपत्रे आहेत; मात्र त्यांचा उपयोग केवळ कागदाच्या तुकड्यांएवढाच राहिला आहे. एका पोस्टमध्ये बिस्मा म्हणते, उच्च गुण आणि पदवी असूनही इंटर्नशिप मिळत नाही. ५० प्रमाणपत्रे आणि १० पदके असूनही दिल्ली विद्यापीठाची ही विद्यार्थिनी इंटर्नशिपसाठी दारोदार भटकत आहे. बिस्माने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, तुम्ही पुस्तके जाळून टाका असं मी म्हणत नाही; परंतु एक कौशल्य निवडणं आणि त्यात तज्ज्ञ बनणं महत्त्वाचं आहे. त्यानंतर, संधी तुमच्याकडे चालून येतील.

ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होताच लाखो लोकांनी पाहिली आणि अनेकजण आता पोस्टवर कॉमेंटही करत आहेत. एका यूजरने लिहिले, आम्हीही या परिस्थितीतून गेलो आहोत, तुमची जिद्द सोडू नका. दुसरा यूजर लिहीतो, प्रमाणपत्रे मुलाखतींमध्ये उपयुक्त असतात, तर कौशल्ये करिअर घडवण्यात मदत करतात. याशिवाय अनेक यूजर्सनी लिहिले की त्यांना अनेक महिने फ्री इंटर्नशिप करावी लागली




## जनावरांनाही पडतं स्वप्न

आपण झोपेत स्वप्नं पाहतो, काही चांगली तर काही भयानक. पण आपल्या घरातला कुत्रा किंवा मांजरदेखील स्वप्न पाहू शकतात, असा विचार तुम्ही कधी केला आहे? हो, हे सत्य आहे! माणसांप्रमाणेच काही जनावरांनादेखील स्वप्नं पडतात, असं वैज्ञानिक संशोधनांमधून समोर आलं आहे. विशेषतः कुत्रा आणि मांजरांसारख्या पाळीव प्राण्यांमध्ये स्वप्नं पाहण्याचं प्रमाण अधिक आढळतं. चला, या विषयाविषयी अधिक जाणून घेऊया.

वैज्ञानिकांच्या मते, झोपेत असताना मेंदूचा एक भाग सक्रिय असतो. त्यामुळे शरीराच्या मानसिक प्रक्रिया आणि स्वप्नांचे अनुभव सुरू राहतात. १९५० मध्ये वैज्ञानिकांनी 'रॅपिड आय मूव्हमेंट' (रेम)चा शोध लावला. हा झोपेचाच एक प्रकार असून या (रेम) काळात आपण स्वप्नं पाहत असतो. 'रेम' काळात माणसांसोबतच कुत्रं आणि मांजरदेखील स्वप्नं पाहतात. 'रेम' ही झोपेची अवस्था माणसांप्रमाणेच अन्य सस्तन प्राणी, पक्षी आणि काही सरपटणारे प्राणीदेखील अनुभवतात.

कधी कधी आपल्या घरातील कुत्रं किंवा मांजर झोपेत दचकून उठतं किंवा अचानक पाय हलवतं. हे स्वप्न पाहण्याचं लक्षण आहे. कुत्रं झोपेत भुंकत असेल किंवा पाय हलवत असेल, तर ते स्वप्नात एखाद्या प्राण्याचा पाठलाग करत असू शकतं. त्याचप्रमाणे, मांजर झोपेत 'म्याऊ' करत असेल, तर तेदेखील काही चांगलं किंवा भयानक स्वप्न पाहत असू शकतं.

वैज्ञानिकांच्या मते जनावरांनादेखील चांगली आणि वाईट स्वप्नं पडतात. चांगली स्वप्नं म्हणजे, ते कदाचित आपल्या आवडत्या खेळण्याशी खेळत असू शकतात किंवा मजा करत असू शकतात. भयानक स्वप्न पडले, तर ते घाबरतात आणि झोपेत विचित्र हालचाली करतात.

प्रत्येक प्राणी आपल्या मानसिक आणि शारीरिक अनुभवाच्या आधारावर स्वप्नं पाहतो. कुत्रं किंवा मांजर जर भयानक स्वप्न पाहत असतील, तर दचकून उठतात किंवा विचित्र हालचाली करतात. यामुळे त्यांच्या शरीराची ऊर्जा आणि मानसिक स्थिती प्रभावित होऊ शकते. तथापि, स्वप्न हा एक मानसिक प्रक्रियांचा भाग आहे आणि यामुळे कोणत्याही प्रकारचा धोका नाही. तुम्ही घरी असलेल्या पाळीव प्राण्यांच्या स्वप्नांचा अनुभव घेत असाल, तर पुढच्या वेळेस त्यांचं झोपेत दचकणं किंवा हलणं अधिक समजून घेऊ शकता. खरं तर, हे सर्व त्यांच्या मानसिक स्थितीचं आणि शारीरिक प्रक्रियेचं लक्षण असू शकतं.



## मैत्री कामाच्या ठिकाणची

आजकाल लोकांच्या आयुष्यातील अधिक वेळ ऑफिसमध्येच जातो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकत्र काम केल्याने सहकाऱ्यांमधील मैत्री अधिक घट्ट होते आणि हळूहळू या नात्याचे प्रेमात रूपांतर होते. यामुळेच कामाचे ठिकाण आता केवळ काम करण्याचे ठिकाण न राहता, लोकांना जोडीदार शोधण्याचे ठिकाणही बनत आहे. किती टक्के लोकांचे कामाच्या ठिकाणी प्रेमसंबंध जुळतात आणि त्यापैकी किती जणांचे लग्न होते? याचा अहवाल समोर आला आहे.

'फोर्ब्स'च्या एका अहवालानुसार, अलीकडील 'वर्कप्लेस रोमान्स सर्व्हे'मध्ये असे दिसून आले आहे, की साठ टक्क्यांहून अधिक लोकांनी त्यांच्या आयुष्यात कधी ना कधी ऑफिसमधील प्रेमसंबंधांचा अनुभव घेतला आहे. इतकेच नाही, तर सर्वेक्षण केलेल्यांपैकी ४३ टक्के लोकांनी असेही सांगितले, की कामाच्या ठिकाणी सुरू झालेले नाते अखेरीस लग्नापर्यंत पोहोचले. अहवालानुसार, यामागे सोयीस्करपणा हे सर्वात मोठे कारण मानले जाते. जवळपास ६५ टक्के प्रतिसादकांनी सांगितले, की दररोज एकत्र काम केल्याने आणि एकमेकांना समजून घेतल्याने नातेसंबंध निर्माण करणे सोपे जाते, तर ६१ टक्के लोकांनी सांगितले, की कामाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे त्यांना कार्यालयाबाहेर नवीन लोकांना भेटायला फारसा वेळ मिळत नाही. ऑफिसमधील सहकारी एकमेकांचे व्यावसायिक जीवन, तणाव आणि दैनंदिन दिनचर्या अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतात. यामुळेच अनेक लोकांचे त्यांच्या सहकाऱ्यांशी पटकन भावनिक नाते निर्माण होते. सर्वेक्षणातून हेही समोर आले आहे, की लोक केवळ कामाचा दिवस अधिक आनंददायी करण्यासाठी नातेसंबंधात येत नाहीत; तर त्यांच्या जोडीदाराने त्यांचे जीवन आणि काम दोन्ही समजून घ्यावे, अशी त्यांची इच्छा असते; मात्र ऑफिसमधील प्रेमसंबंध नेहमीच सोपे नसतात.



# ‘आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही काढू’ : आ. संग्राम जगताप; अहिल्यानगर महापालिकेकडून सर्जेपुरा रोडवरील अतिक्रमणांवर हातोडा


सर्जेपुरा रोडवरील अतिक्रमणांची पाहणी करताना आमदार संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

नगर – शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि डीपी रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्णत्वास नेण्यासाठी महानगरपालिकेकडून सर्जे पुरा रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या कारवाईची आमदार संग्राम जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला विविध सूचना दिल्या. यावेळी त्यांनी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्य शासनाकडून शहरातील डीपी रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आणण्यात आला असून गेल्या एक वर्षापासून विविध रस्त्यांची काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांमध्ये अडथळा ठरणारी अनेक अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र या प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी दुहेरी निकष लावले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहराच्या विकासासाठी रस्ते रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण अत्यंत आवश्यक आहे. अनेक नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करत स्वतःहून आपली अतिक्रमणे आणि हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळे मागे घेतली. शहराच्या विकासाला प्राधान्य देत त्यांनी मोठा त्याग केला. मात्र काही प्रवृत्तींकडून अतिक्रमणे कायम ठेवली जात आहेत आणि त्यावर कारवाई करण्यास प्रशासन धजावत नसल्याचे चित्र दिसत आहे.

ते पुढे म्हणाले की, अचानक रस्त्याच्या कडेला थडगी उभी करणे, त्यांना रंगरंगोटी करणे आणि त्याच्या आडून रस्त्यांमध्ये अतिक्रमण निर्माण करणे ही गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत थडग्यांचे वाढते प्रमाण हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. विकासकामांसाठी जर हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळांवर कारवाई केली जात असेल, तर इतर अनधिकृत अतिक्रमणांवरही समान निकष लावले गेले पाहिजेत. प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर एकसमान कारवाई करावी.

आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही आमची काढून घेऊ, अशी भूमिका मांडत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला. हिंदूंना वेठीस धरण्याचे काम प्रशासनाने करू नये. विकासकामांच्या नावाखाली एकाच समाजावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणीही तितक्याच निष्पक्षपणे झाली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.


स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांचा ‘ग्लोबल स्पिरिचुअल लीडरशिप अवॉर्ड’ने सन्मान करण्यात आला.

## ‘ग्लोबल स्पिरिचुअल लीडरशिप अवॉर्ड’ने स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांचा सन्मान

नगर – कोलकाता येथील हल्दीराम बँक्वेट मध्ये आयोजित श्री हनुमान कथा कार्यक्रमामध्ये अयोध्येतील राम मंदिर निर्माण समितीचे कोषाध्यक्ष, मथुरेतील कृष्ण जन्मभूमी ट्रस्टचे उपाध्यक्ष आणि आध्यात्मिक गुरू स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांचा ’ग्लोबल स्पिरिचुअल लीडरशिप अवॉर्ड’ देऊन सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार ’विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स’तर्फे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त वैदिक ज्योतिषी, लाइफ कोच व समाजसेविका डॉ. सोहिनी शास्त्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ’विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स’चे अध्यक्ष आणि १८४ जागतिक विक्रम प्रस्थापित करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

## राहुरीत तनपुरे कारखान्याजवळ दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीतील नगरच्या दोघांना पकडले, ४ जण पसार

राहुरी – राहुरी येथील डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखाना परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीतील दोघांना कारखान्याच्या सुरक्षारक्षकांनी पकडून राहुरी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. यावेळी त्यांचे चार साथीदार घटनास्थळावरून पसार झाले आहेत. ही कारवाई ९ जून रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली.

याबाबत कारखान्याचे सेक्युरिटी सुपरवायझर अनिकेत दिलीप तनपुरे (वय ४७, रा. राहुरी फॅक्टरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ९ जून रोजी पहाटे २.१४ च्या सुमारास डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या मेनगेटजवळील व्हीआयपी गेस्ट हाउसजवळ काही संशयित इसम अशोक लेलंड कंपनीचा एक टेम्पो (विना नंबर) घेऊन दरोड्याच्या तयारीत असल्याचे सुरक्षारक्षकांना दिसून आले. त्यांनी त्यातील कुणाल बबन रोकडे (वय २०) आणि महेश बिरजू रोकडे (दोघेही रा. लालटाकी, अहिल्यानगर) या दोघांना शिताफीने पकडले.

यावेळी त्यांचे अन्य चार साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाले. घटनास्थळावरून आरोपींचा अशोक लेलंड टेम्पो, तसेच दरोड्यासाठी वापरण्यात येणारी एक लोखंडी हातोडी, एक लोखंडी रॉड आणि एक एक्सा ब्लेड अशी हत्यारे जप्त करण्यात आली.

याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पकडलेले दोघे व फरार चौघे अशा ६ जणांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१० (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अडागळे करत आहेत.

## माजी सैनिकाला महानगरपालिकेची नोटीस; मालमत्तेवरील उत्पन्नावर ४५ टक्क्यांपर्यंत कर

### ही महापालिका आहे की लोकांच्या उत्पन्नातील भागीदार संस्था : मनसुख वाबळे यांचा सवाल



नगर – अहिल्यानगर महापालिकेने सुधारित कररचनेत एका निवृत्त भारतीय नौदल अधिकाऱ्याला वाढीव कर आकारणीची नोटीस बजावली आहे. विशेष म्हणजे यात महापालिकेने क्षेत्रफळानुसार कर न लावता, भाड्याच्या उत्पन्नावर अतिरिक्त कर लावला आहे. हा कर जवळपास ४५ टक्क्यांपर्यंत जात असून, महापालिकेने यासंदर्भात कर मुल्यांकन कसे केले, याचा सविस्तर खुलासा करावा. ही महापालिका आहे की लोकांच्या उत्पन्नातील भागीदार संस्था, आहे असा सवालही वाबळे यांनी उपस्थित केला आहे.

पारिजात चौक येथे मनसुख पाटीलराव वाबळे यांची मिळकत आहे. वाबळे हे भारतीय नौदलातून निवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतर आलेल्या पैशांमधून उतारवयात उत्पन्नाचे साधन असावे म्हणून त्यांनी ही मिळकत खरेदी केली होती. मात्र, मिळकतीवरील भाड्यापोटी महापालिकेने त्यांना तब्बल ३ लाख ८८ हजार ८०० रुपयांचा कर आकारला आहे. हा कर महापालिकेने कसा आकारला आहे, याचा सविस्तर खुलासा त्यांनी महापालिकेकडे मागितला आहे. मात्र, अद्याप त्यांना महापालिकेने खुलासा केलेला नाही.

वाबळे यांनी यासंदर्भात महापालिकेच्या कर संकलन विभागाला पत्र पाठविले आहे. त्यात वाबळे यांनी नमूद केले आहे, मी १९९७ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या बचतीच्या पैशातून मालमत्ता खरेदी केली. या मालमत्तेचा नियमित कर महापालिकेला भरत आहे. तसेच मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नावर आयकर (इन्कटॅक्स) देखील भरत आहे. मात्र, अलीकडेच महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणातून त्यांना मालमत्तेच्या भाड्याच्या उत्पन्नावर मोठा कर लावण्यात आला आहे. ही मालमत्ता महानगरपालिकेच्या हद्दीत आहे, हे आम्हाला मान्य आहे आणि त्यापोटी जो योग्य कर आहे तो आम्ही भरत आहोत. परंतु, माझ्या उदरनिर्वाहासाठी मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नावर अतिरिक्त कर लावणे चुकीचे आहे. हे उत्पन्नावर आधारित ४५ टक्के कर लावणे म्हणजे एक प्रकारे लुटच आहे, असा आरोप वाबळे यांनी केला आहे.

निवृत्त सैनिक या नात्याने आणि शासन नियमांनुसार मिळणाऱ्या सवलतींचा उल्लेख करत त्यांनी महापालिका प्रशासनाला विनंती केली आहे की, या प्रकरणाचा सखोल अभ्यास करावा. मालमत्तेची आकारणी ही केवळ जागेच्या क्षेत्रफळानुसारच असावी, ना की मिळणाऱ्या उत्पन्नावर, अशी विनंती देखील त्यांनी महापालिकेकडे केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनाही पत्र दिले आहे.

## बँक कर्मचाऱ्याला १ लाख रुपयांची मागणी करत जातीवाचक शिवीगाळ

### केडगावच्या भूषणनगर येथील घटना, ४ जणांविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरात घडलेल्या जुन्या वादाच्या कारणावरून एका खासगी बँकेत कार्यरत असलेल्या ऑफिस बॉयला एक लाख रुपयांची मागणी करत जातीवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निलेश साहेबराव पंचमुख (वय ३४, रा. सिद्धार्थनगर, नवबौद्ध वस्ती, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आयसीआयसीआय बँकेच्या केडगाव शाखेत कंत्राटी पद्धतीने ऑफिस बॉय म्हणून कार्यरत आहेत. २६ मे रोजी बँकेच्या कामानिमित्त ते भूषणनगरच्या झेंडा चौक येथे गेले असता त्यांच्या पाठीमागून ट्रिपल सीट आलेल्या दुचाकीस्वारांची गाडी घसरून पडली. त्यानंतर संबंधितांनी पंचमुख यांना अडवून शिवीगाळ व मारहाण केली.

तसेच त्यांना एका शाळेच्या परिसरात नेऊन पुन्हा मारहाण करण्यात आली. यावेळी त्यांचा मोबाईल फोन, खिशातील रोख रक्कम व त्यांच्या ताब्यातील दुचाकी घेऊन गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नंतर बँक व्यवस्थापकांच्या मध्यस्थीने संबंधितांनी मोबाईल, पैसे व दुचाकी परत केल्याने त्यावेळी कोणतीही तक्रार करण्यात आली नव्हती. मात्र, ९ जून रोजी सायंकाळी केडगाव येथील एका कार्यालयात त्यांना बोलावून घेतल्यानंतर ओंकार दिलीप सातपुते, ओम किरण बारवकर, अभय कारखेले, अनिकेत शिर्के तसेच अन्य दोन जणांनी जुन्या घटनेचा संदर्भ देत मोबाईल फुटल्याची भरपाई म्हणून एक लाख रुपयांची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर संबंधितांनी जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केले तसेच कामावर येऊ देणार नाही, हात-पाय तोडून टाकू अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस उपअधिक्षक शिरीष वमने हे करत आहेत.

## अहिल्यानगरजवळ मावा आणि सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त

### अन्न व औषध प्रशासन पथकाची कारवाई, आरोपीला अटक

नगर – नगर तालुक्यातील जेऊर येथील मगरवस्ती भागात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने एका मोठ्या कारवाईत मानवी आरोग्यास अत्यंत अपायकारक आणि घातक असलेला प्रतिबंधित सुगंधी तंबाखू तसेच तयार मावा याचा मोठा साठा जप्त केला आहे. हा साठा आपल्या राहत्या घराशेजारील पत्राच्या शेडमध्ये लपवून ठेवणाऱ्या प्रशांत रामदास मगर (वय ३३, रा. मगरवस्ती, जेऊर बायजाबाई, ता.नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यास अटक केली आहे.

या संदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या महिला अन्नसुरक्षा अधिकारी साजिदा अब्दुल रशिद मुल्ला (वय २७, रा. अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात सुगंधी तंबाखू व मावा उत्पादन आणि साठवणुकीवर पूर्णपणे बंदी घातलेली असतानाही या आदेशाचे उल्लंघन केल्याचे कारवाईत स्पष्ट झाले.

अन्न व औषध प्रशासन विभागाला याबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. त्यांनी एमआयडीसी पोलिसांच्या पथकासोबत ९ जून रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास जेऊर येथील मगरवस्ती भागात छापा टाकला. प्रशांत रामदास मगर याने त्याच्या घराशेजारील पत्र्याच्या शेड मध्ये हा साठा ठेवलेला होता.

हा सर्व मुद्देमाल या कारवाईत जप्त करण्यात येवून आरोपी मगर याला अटक करण्यात आली आहे.

## पाणीपुरवठ्याचे व्हॉल्व बसविण्यासाठी खोदले खड्डे; आता मनपा पाणीही सोडेना आणि खड्डेही बुजवेना



नगर – महापालिकेने सोलापूर रोडवरील पाईपलाईन आणि शहरातील बाबा बंगाली चौक परिसरातील पाण्याची पाईपलाईन वेगवेगळी केली आहे. शहरात सिमेंटचे रस्ते खोदून नवीन पाईलाईन टाकली आहे. या पाईपलाईनवर व्हॉल्व बसविण्यासाठी ठिकठिकाणी खड्डे खोदून ठेवले आहेत. मात्र, मागील दहा दिवसांपासून हे खड्डे तसेच आहेत. महापालिकेने ना व्हॉल्व बसविले, ना पाणी पुरवठा सुरळीत केला. त्यामुळे प्रवाशांना खड्ड्यांचा अडथळा होत आहे तर या परिसरातील नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही, अशी अवस्था झाली आहे.

शहरात विविध विकासकामांच्या नावाखाली जागोजागी रस्ते खोदून ठेवले आहेत. यामुळे नागरिकांचे हाल होत असून, हे खड्डे अपघातांना निमंत्रण देत आहेत. बाबा बंगाली चौक ते जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंतच्या परिसरात रस्त्यावर ठिकठिकाणी खोदकाम करून ते तसेच सोडून देण्यात आले आहे. पाईपलाईनवर व्हॉल्व बसविण्यासाठी पाणी पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या दहा दिवसांपासून पिण्याचे पाणीही बंद असल्याने नागरिक संतापले आहेत. महापालिका प्रशासनाच्या या गलथान कारभाराविरोधात आता संतप्त नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

बाबा बंगाली चौक आणि परिसरात महापालिकेच्या पाईपलाईनवर व्हॉल्व बसविण्यासाठी ठिकठिकाणी चार मोठे खड्डे खोदण्यात आले आहेत. काही खड्डे एकदम रस्त्यावरच आहेत. त्यामुळे हे खड्डे अपघातांना निमंत्रण ठरत आहेत. रात्रीच्यावेळी या परिसरात नेहमीच वीज पुरवठा खंडीत होतो. अशावेळी रात्री अंधारात या खड्ड्यांमध्ये पडण्याचे प्रमाण वाढले आहे. मागील काही दिवसात तीन ते चारजण या खड्ड्यांमध्ये पडल्याचे स्थानिक सांगतात. रात्रीच्या वेळी हे खड्डे असल्याचे लक्षात न आल्याने दुचाकीस्वार आणि पादचारी पडण्याचे प्रकार नित्याचेच झाले आहेत. याबाबत महापालिका प्रशासन आणि स्थानिक नगरसेवकांना याबाबत दूरध्वनीद्वारे तक्रार करूनही, केवळ काम चालू आहे, असे मोघम उत्तर दिले जाते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

रस्ते खोदून ठेवल्याने त्रास होत असतानाच, दुसरीकडे नवीन पाणीपुरवठा पाईपलाईनवर व्हॉल्व्ह बसवण्यासाठी हे खड्डे खोदले, पण काम अर्धवटच आहे. विशेष म्हणजे, याच पाईपलाईनच्या कामामुळे संबंधित परिसरात गेल्या दहा दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे बंद आहे. सध्या कडक उन्हाळा सुरू असताना पिण्याच्या पाण्यासाठी नागरिक वणवण भटकत आहेत. मात्र पाणीपुरवठा विभागातील अधिकारी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. महापालिका नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत शेख सलीम, रिझवान पठाण, कासम कुरेशी, रियाज खान, शादाब तांबोळी आणि इम्रान तांबोळी यांच्यासह परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## कौटुंबिक न्यायालयाच्या नवीन न्यायाधीश वर्षा पारगावकर यांचे वकील संघाकडून स्वागत


कौटुंबिक न्यायालयाच्या नवीन न्यायाधीश वर्षा पारगावकर यांचे वकील संघाकडून स्वागत करण्यात आले.

नगर – शहरातील कौटुंबिक न्यायालयात नुकत्याच न्यायाधीश म्हणून रुजू झालेल्या वर्षा पारगावकर यांचे कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

कार्यक्रमास कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, शिवाजी कराळे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. राजेश कावरे, ॲड. शिवाजी सांगळे, ॲड. रघूनाथ बनकर, ॲड. संतोष कांडेकर, ॲड. वसीम खान, ॲड. अरुणा राशिनकर, ॲड. मनोज जायभाय, ॲड. कौस्तुभ कुलकर्णी, ॲड. रघूनाथ मुरुमकर यांच्यासह कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक नितीन धोंगडे, सहाय्यक अधीक्षक आसिफ शेख, रोहित गुंडू, धीरज नारखेडे, अर्चना झिंजे, एस. एस. चव्हाण, विकास वाघमारे, तुषार गुंड, श्रीमती एस. एस. पगारे, श्रीमती जाधव तसेच न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

न्यायाधीश वर्षा पारगावकर या यापूर्वी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होत्या. न्यायिक सेवेमधील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि कार्यकुशलतेमुळे न्यायव्यवस्थेत त्यांनी विशेष ठसा उमटविला आहे. नुकतीच त्यांची बदली होऊन त्या अहिल्यानगर येथील कौटुंबिक न्यायालयात न्यायाधीश म्हणून रुजू झाल्या आहेत.

स्वागत समारंभात उपस्थितांनी पारगावकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कौटुंबिक न्यायालय हे समाजातील संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयांशी निगडित असल्याने न्यायदान प्रक्रियेत समन्वय, संवेदनशीलता आणि न्यायनिष्ठा यांना विशेष महत्त्व आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ न्यायालयीन कामकाजाला होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी न्यायालयीन कामकाज अधिक प्रभावी, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी वकील संघाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमात न्यायालयीन कामकाज, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक समन्वय यावरही चर्चा करण्यात आली.

## केडगावात बँकेने जप्त केलेल्या घरात सील तोडून घुसखोरी; कर्जदारावर गुन्हा दाखल

नगर –न्यायालयाच्या आदेशाने बँकेने जप्त केलेल्या घराचे सील तोडून, आत बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याप्रकरणी एका कर्जदाराविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना केडगाव येथील मराठा नगर भागातील नाथकृपा रेसीडेन्सीमध्ये घडली आहे.

याप्रकरणी ’आवास फायनान्शियर्स’ बँकेचे टीम लीडर आकाश अर्जुन गंगणे (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून कर्जदार आरोपी गणेश अनंतराव उनावणे (रा. केडगाव, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपी गणेश उनावणे याने केडगाव येथील आपल्या फ्लॅटवर आवास फायनान्शियर्स बँकेकडून एकूण १५ लाख २० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. सुरुवातीला काही महिने हप्ते भरल्यानंतर त्याने कर्ज फेडणे बंद केले. बँकेने वारंवार मागणी करूनही कर्ज न फेडल्यामुळे, बँकेने अप्पर जिल्हा दंडाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे मालमत्ता जप्तीसाठी अर्ज केला होता. त्यानुसार, अधिकाऱ्यांनी २१ जून २०२२ रोजी या घराचा रीतसर ताबा बँकेकडे सोपवला होता आणि घराला सील ठोकले होते. तेव्हापासून ही मालमत्ता बँकेच्या ताब्यात होती. मात्र, आरोपी गणेश उनावणे याने बँक किंवा प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता, घराचे सील आणि कुलूप तोडले. बँकेच्या अधिकृत अधिकाराचे उल्लंघन करून त्याने घरात अनाधिकृतपणे प्रवेश केला आणि घराचा ताबा घेतला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर बँकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.


जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये पीआय दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या मागणीचे निवेदन विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

## जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये पीआय दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करा

नगर – अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील भिंगार, एमआयडीसी तसेच नगर तालुका यांसारख्या महत्त्वाच्या व संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) प्रभारी म्हणून कामकाज पाहत असल्याने या ठिकाणी पूर्णवेळ पोलीस निरीक्षक (पीआय) दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी विश्व मानवाधिकार परिषदेचे प्रदेशाध्यक्ष नावेद शेख, जिल्हाध्यक्ष अजीम शेख, अल्ताफ शेख, सोहेल शेख, अरुण कोकडे, शरीफ सय्यद, सनाउल्लाहा तांबटकर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका ही पोलीस ठाणी क्षेत्रफळ, लोकसंख्या व संवेदनशीलतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. मात्र या ठिकाणी सध्या एपीआय दर्जाचे अधिकारी प्रभारी म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच चोरी, दरोडे, खून, खंडणी, ताबामारी, बेकायदेशीर धंदे आदी गंभीर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करून वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका पोलीस ठाण्यांमध्ये पूर्णवेळ पीआय दर्जाचे अधिकारी नियुक्त करण्यात यावेत, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

